


दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर    संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : मंगळवार, १३ ऑक्टोबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३०४ | किंमत : २ रूपये



Hotel
Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075



सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...

नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...

- आजच संपर्क करा -

८६९८७८८६६६
९६५७२३२०२६


# दिल्लीत पोलिसांच्या वेशातील भाडोत्री गुंड?

**वृत्तसंस्था, मुंबई**

राजधानी दिल्लीत कॉकरोच जनता पार्टीने मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात आंदोलन सुरू केले आहे. पोलिसांनी आंदोलन सुरू होण्यापूर्वीच आंदोलकांची धरपकड सुरू केली. यावेळी काही पुरुष पोलिसांकडून मुली व महिलांना धक्काबुक्की केल्याचा देखील आरोप ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केंद्र सरकारवर केला आहे.

संजय राऊत यांनी एक व्हिडिओ पोस्ट केला आहे. या व्हिडिओमध्ये एका गाडीत खाकी वर्दी असल्याचे दिसून येत आहे. हा व्हिडिओ शेअर करत राऊत यांनी म्हटले की, ज्या पोलिसांना रस्त्यावर गुंडागर्दी



करताना पाहिले, महिला मुलींवर हात टाकताना दिसले, ते भाजपचे (अमित शहा) नकली पोलिस होते. भाडोत्री गुंडांना खाकी गणवेश देऊन आंदोलकांना रोखण्यासाठी उतरवले होते, असा खळबळजनक आरोप राऊत यांनी केला आहे.

तसेच पुढे संजय राऊत म्हणाले, दिल्लीत आंदोलनाच्या आसपास खाकी पोलिस वर्दीने गच्च भरलेल्या गाड्या होत्या, कोणासाठी? नेमप्लेटशिवाय जे पोलिस दिसत होते ते अशी वर्दी घातलेले गुंड होते. हाच राष्ट्रीय सुरक्षेचा गुजरात पॅटर्न आहे. उघडा डोळे आणि बघा नीट, अशी टीका राऊत यांनी केली आहे.

**लंडनमध्ये नेत्यांसोबत बॅडमिंटन खेळता**

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी लोकसभेतील शिष्टमंडळासह सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांची भेट मागितली होती. सुरुवातीला वेळ देऊन नंतर अचानक राजकीय नेत्यांना भेटण्याचा अधिकार नाही, असे सांगत सरन्यायाधीशांनी स्वतःचे दरवाजे बंद करून घेतले. ८० हून अधिक न्यायाधीश लंडनमध्ये जाऊन राजकीय नेत्यांसोबत बॅडमिंटन खेळतात, मुख्यमंत्र्यांच्या डिनर पार्ट्यांना हजेरी लावतात, तेव्हा चालते; मग देशातील कोट्यवधी जनतेच्यावतीने मतचोरीचा जाब विचारण्यासाठी विरोधी पक्षनेते आले तर दरवाजे का बंद करता? असा स्फोटक सवाल खासदार संजय राऊत यांनी उपस्थित केला आहे.

### थोडक्यात

## आदिवासी विद्यार्थ्यांच्या आंदोलनानंतर सरकार ॲक्शन मोडवर

**नाशिक :** राज्यातील आदिवासी आश्रमशाळांमध्ये 'सेंट्रल किचन' द्वारे पुरवण्यात येणाऱ्या अन्नाच्या निकृष्ट दर्जाबाबत आणि विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांबाबत विद्यार्थ्यांनी पुकारलेल्या आक्रमक आंदोलनानंतर अखेर राज्य सरकार आणि आदिवासी विकास विभाग ॲक्शन मोडवर आला आहे. विद्यार्थ्यांच्या तीव्र असंतोषाची दखल घेत आदिवासी विकास विभागाने ९ सदस्यांची विशेष समिती गठीत केली असून, या समितीला ३० ऑक्टोबरपर्यंत सेंट्रल किचनसंदर्भात सविस्तर आणि वस्तुनिष्ठ तपासणी अहवाल आदिवासी विकास आयुक्तांकडे सादर करण्याचे कडक आदेश देण्यात आले आहेत. विद्यार्थी आणि पालकांचे अभिप्राय शासनाकडून गठीत करण्यात आलेली ही ९ सदस्यीय समिती आश्रमशाळांना प्रत्यक्ष भेटी देऊन अन्नाच्या गुणवत्तेची सखोल पाहणी करणार आहे. आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना दिले जाणारे अन्न ताजे, सात्विक आणि उत्तम दर्जाचे आहे की नाही, तसेच अन्नपुरवठा व्यवस्थेत काय त्रुटी आहेत, याची चौकशी ही समिती करेल. सेंट्रल किचनमधून मिळणाऱ्या अन्नाबाबत आश्रमशाळेतील विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांचे थेट अभिप्राय नोंदवून वस्तुनिष्ठ अहवाल तयार केला जाईल. आंदोलनादरम्यान सरकारने दिलेल्या लेखी आश्वासनानुसार, अन्नाचा दर्जा निकृष्ट आढळल्यास संबंधित ठेकेदाराचा ठेका रद्द करण्याची कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. दरम्यान, जळगाव जिल्ह्यात आदिवासी बांधवांच्या प्रलंबित मागण्यांसाठी लोक संघर्ष मोर्चाच्यावतीने आज शिवतीर्थ मैदानापासून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.

# ज्ञानेशकुमार यांच्याकडून लोकशाहीची हत्या, ३२ कोटी मते कमी करण्याचे पाप

**वृत्तसंस्था, मुंबई**

आम्ही संविधान आणि लोकशाही वाचवण्याच्या भूमिकेत आहोत आणि आमच्याकडे त्यासाठी भक्कम पुरावे आहेत. स्वर्गीय राजीव गांधी यांच्या कार्यकाळात निवडणूक आयोगाला देण्यात आलेल्या स्वायत्ततेचा आज चुकीचा अर्थ लावला जात आहे. देशात अराजकता माजवण्याचे काम केंद्रसरकार करत असल्याची टीका काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी केली आहे.

नाना पटोले म्हणाले की, ज्ञानेशकुमार यांनी ३२ कोटी मते कमी करण्याचे पाप केले आहे. त्यांच्या माध्यमातून देशात लोकशाहीची हत्या करण्याचे सत्र सुरू आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांच्या देखील ही बाब लक्षात आली आणि त्यांनी स्पष्ट केले की असे निर्देश आम्ही दिले नव्हते. या सगळ्यामागे मोदी आणि आरएसएसचा दबाव आहे का? सत्ताधा-यांकडून सध्या दबावाचे राजकारण सुरू आहे. आता यांना कुठेतरी थांबवले पाहिजे आणि देशाला वाचवले पाहिजे, हीच आमची ठाम भूमिका आहे.

नाना पटोले म्हणाले की, महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीनंतर तब्बल ४६



लाख मते वाढली. मतदानाच्या दिवशी दर दोन तासांनी मतदानाची टक्केवारी देशातील जनतेला सांगणे बंधनकारक असताना, ती सांगितली गेली नाही. संध्याकाळी ५ नंतर झालेले मतदान किती, हे गुपित ठेवले गेले आणि दुसऱ्या दिवशी थेट दुपारी ३ वाजता १० टक्के मतदान अचानक वाढवून दाखवण्यात आले. आम्ही त्याचे सीसीटीव्ही फुटेज मागितले, कारण तो आमचा अधिकार होता; परंतु निवडणूक आयोगाने फुटेज दिले नाही आणि उलट कायदाच बदलून टाकला.

नाना पटोले म्हणाले की, चोरी दाढीमध्ये तिनका अशी आजची परिस्थिती निर्माण झाली आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार म्हणूनच आमच्या भेटी टाळत आहेत, कारण त्यांना या सर्व गोष्टींची जाणीव आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दबावाखाली हे लोक काम करत आहेत, म्हणूनच ते विरोधकांना भेटण्याचे टाळत आहेत.

# ज्येष्ठ अभिनेत्री मधू कांबीकर काळाच्या पडद्याआड

**वृत्तसंस्था, मुंबई**

मराठी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेत्री आणि लावणीसम्राज्ञी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मधू कांबीकर यांचे पुण्यात निधन झाले. वयाच्या ७३ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. आपल्या दमदार अभिनयाने आणि लावणीच्या खास शैलीने त्यांनी अनेक वर्षे प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले.

चित्रपटांमध्ये आई, सासू अशा विविध भूमिका साकारत त्यांनी मराठी मनोरंजनविश्वात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. मात्र, एका लावणीच्या



कार्यक्रमादरम्यान आलेल्या पक्षाघाताच्या झटक्यानंतर त्यांच्या आयुष्याला वेगळे वळण मिळाले.

मधू कांबीकर यांनी मराठी चित्रपटसृष्टीत आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. सहजसुंदर अभिनय, प्रभावी संवाद आणि लावणी सादर करण्याची खास शैली यामुळे त्या प्रेक्षकांच्या पसंतीस उतरल्या. झपाटलेला, डेबू, बिनकामाचा नवरा, माझा छकुला आणि एक होता विदूषक यांसारख्या चित्रपटांमधून त्यांनी विविध भूमिका साकारल्या. चित्रपटांमध्ये त्यांनी अनेकदा आई आणि सासूच्या भूमिका साकारल्या. अभिनयासोबतच लावणीसाठी देखील त्यांचे योगदानही उल्लेखनीय होते. त्यामुळे त्या केवळ अभिनेत्री म्हणूनच नव्हे, तर एक कुशल लावणी कलाकार म्हणूनही ओळखल्या जात होत्या.

# समृद्धी महामार्गावर अपघात, २ ठार

**दै. सिंहवाणी वृत्त, अमरावती**

मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावर आज सकाळी दुर्दैवी अपघात घडला. धावत्या ट्रकचा अचानक टायर फुटल्याने ट्रकला भीषण आग लागली. काही क्षणात आगीने रौद्ररूप धारण केले. या अपघातात ट्रकमधील दोन जणांचा जागीच होरपळून मृत्यू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हा अपघात अमरावती जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील तळेगाव पोलीस स्टेशनच्या हद्दीत घडला. समृद्धी महामार्गावरील चॅनेल नंबर १२७ जवळून हा ट्रक जात होता. हा ट्रक फुलकोबी (फ्लॉवर) घेऊन जात होता. त्याचवेळी ही दुर्दैवी घटना घडली.

समृद्धी महामार्गावरून जात असताना अचानक ट्रकचा टायर मोठ्या आवाजासह फुटला. टायर फुटल्यामुळे गाडीवरील नियंत्रण सुटले आणि ट्रकला अचानक आग लागली. आग इतकी वेगाने पसरली की ट्रकमध्ये बसलेल्या दोन जणांना बाहेर पडण्याची संधीच मिळाली नाही आणि त्यांचा जागीच होरपळून मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच तळेगाव पोलीस आणि महामार्ग पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे. ट्रकला आग लागून झालेल्या दुर्घटनेनंतर समृद्धी महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती.

# जम्मू-काश्मीरच्या पूंछमध्ये सुरुंगस्फोट, तोयबाच्या कमांडरसह ४ दहशतवादी ठार



**वृत्तसंस्था, जम्मू**

जम्मू आणि काश्मीरच्या पूंछ जिल्ह्यात नियंत्रण रेषेवरून घुसखोरी करण्याचा प्रयत्न करत असताना झालेल्या सुरुंग स्फोटात लष्कर-ए-तोयबाच्या एका प्रमुख कमांडरसह चार दहशतवादी ठार झाल्याची माहिती समोर आली आहे. जम्मू-काश्मीरमधील कृष्णा घाटी सेक्टरमधील सतवाल नाकी परिसरात हा स्फोट झाला. या स्फोटात चार दहशतवादी ठार झाले आहेत.

मृतांमध्ये लष्कर-ए-तोयबाचा वरिष्ठ कमांडर मोहम्मद फैजान याचा समावेश आहे. तसेच मोहम्मद फैजानसह आणखी तीन दहशतवादी ठार झाल्याची माहिती समोर आली आहे. घुसखोरी रोखण्यासाठी सुरक्षा व्यवस्थेचा भाग म्हणून त्या ठिकाणी सुरुंग ठेवण्यात आलेले होते. नियंत्रण रेषा ओलांडण्याचा प्रयत्न करताच या भूसुरुंगाचा स्फोट झाला आणि त्यात चारही घुसखोर जागीच ठार झाले आहेत. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.

दरम्यान, या चारही दहशतवाद्यांची ओळख मोहम्मद इश्तियाक, मोहम्मद फैजान, वकास आणि असीम अशी पटली आहे. ही घटना सोमवारी पुंछ जिल्ह्यातील सतवाल-नाकी परिसरात घडली आहे. या भागात घुसखोरी रोखण्यासाठी सुरक्षा दलांनी नियंत्रण रेषेवर कडक पहारा तैनात केला आहे. स्फोटाची घटना घडल्यानंतर आता सुरक्षेबाबत अधिक सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.दरम्यान, दहशतवाद्यांचा हा गट सोमवारी सतवाल-नाकी परिसरात घुसखोरी करण्याचा प्रयत्न करत होता.

मात्र, त्या दरम्यानच ते सुरुंगांनी भरलेल्या परिसरात पोहोचले आणि मोठा स्फोट झाला. या स्फोटात चारही दहशतवादी ठार झाले असल्याची माहिती सांगण्यात येत आहे. या घटनेनंतर आता सुरक्षा दलांनी या संपूर्ण परिसरात सतर्कतेचा इशारा देत नियंत्रण रेषेवरील निगराणीमध्ये आणखी वाढ करण्यात आली आहे.

# सोमेश्वर कारखाना निवडणुकीत सुनेत्रा पवारांनी उघडले खाते



**वृत्तसंस्था, बारामती**

बारामतीतील सोमेश्वर कारखाना निवडणुकीचे निकाल यायला सुरुवात झाली आहे. या निवडणुकीत राष्ट्रवादीच्या नेत्या आणि राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा प्रचंड विजय होताना दिसत आहे. या निवडणुकीत सुनेत्रा पवार यांच्या पॅनलने खाते उघडले आहे. त्यांच्या एका उमदेवाराचा विजय झाला आहे. अजितदादा पवार यांच्या निधनानंतर एखाद्या निवडणुकीतील सुनेत्रा पवार यांचा हा पहिलाच मोठा विजय आहे. त्यामुळे राष्ट्रवादीमध्ये जल्लोषाचे वातावरण आहे.

सोमेश्वर साखर कारखान्याच्या निवडणुकीचा निकाल यायला सुरु झाल आहे. या निवडणुकीत सुनेत्रा पवार यांच्या पॅनलने खातं उघडलं आहे. या निवडणुकीत सुनेत्रा पवार यांचे उमेदवार संग्राम सोरटे हे ब वर्ग गटातून विजयी झाले आहेत. संग्राम सोरटे यांना १३१ पैकी ९२ मत मिळाली आहेत.

सुनेत्रा पवार आणि त्यांच्या पॅनलसाठी हा मोठा विजय मानला जात आहे. ही निवडणूक केवळ बारामतीची असली तरी संपूर्ण राज्याचं लक्ष या निवडणुकीकडे लागलं होतं. अजितदादा यांच्या नंतर सुनेत्रा पवार या कशा कामगिरी करतात याकडे हे लक्ष लागले होते.

# अखेर अनिल सोलेंचे बंड शमले!

## मुख्यमंत्री फडणवीस आणि महसूलमंत्री बावनकुळेंच्या प्रयत्नांना यश, कोहळेंच्य विजयासाठी प्रयत्नरत

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर पदवीधर मतदारसंघातून भाजपचे नेते अनिल सोले यांनी बंडखोरी केली होती. अखेर आज त्यांचं बंड शमलं आहे. खुद्द राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज नागपुरात आले होते. यावेळी त्यांच्या चर्चा झाल्यानंतर अनिल सोले यानी माघार घेतली आहे. मला भाजपने कधीच काढले नव्हते. मी बंडखोर म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतरही पक्षाने माझ्यावर कारवाई केली नव्हती. मी उचललेल्या प्रश्नांची दखल पक्षाने घेतली आहे. त्याबद्दल सोल्युशन दिलं आहे. त्यामुळे मी माझी उमेदवारी मागे घेत असल्याची माहिती सोले यांनी दिली.

**मोठ्या मताधिक्याने भाजप या मतदारसंघात विजयी होईल**

भाजपचे उमेदवार सुधाकर कोहळे यांच्या प्रचाराला सर्वांनी लागावं असे आवाहन त्यांनी केलं आहे. मी सांगितलेलं पक्षाने ऐकलं आहे. पक्षातील महाराष्ट्रातील सर्वोच्च नेता माज्या घरी आले आणि त्यांनी माझे ऐकून घेतलं. माझ्यासोबत सर्व जुन्या कार्यकर्त्यांसोबत गेले दोन-तीन दिवस चर्चा विमर्श सुरू होतं. मी गणिताचा विद्यार्थी आहे, शिक्षक आहे. गणित माझ्या लक्षात येते. त्यामुळे मी विचार केला की आपल्या पावलांमुळे भाजपला नुकसान होऊ नये. भाजपचा गणित चुकू नये. आता २७ ऑक्टोबरला तुम्ही पहाल मोठ्या मताधिक्याने भाजप या मतदारसंघात विजयी होईल असा विश्वास सोले यांनी व्यक्त केला.

नितीन गडकरी यांनी मला सांगितले होते की पक्ष मोठा आहे, तुम्ही समजूतदार आहात, जर देवेंद्र फडणवीस तुमच्याशी बोलत असतील, तर तुम्ही त्यांना सकारात्मक प्रतिसाद दिला पाहिजे, असे नितीन गडकरी यांनी मला सांगितले होते. आज जेव्हा अचानक मुख्यमंत्री माझ्या घरी आले, तेव्हा माझ्यासमोर कुठलाच पर्याय उरला नाही, दौरा सोडून मला घरी यावं लागलं. माझा नेहमीच आशीर्वाद शिष्य (सुधाकर कोहळे) सोबत राहिला आहे. मी शिक्षक असल्याने जो प्रश्न घेऊन माझ्यासमोर येईल त्याला उत्तर देणे माझा कर्तव्य असल्याचे सोले म्हणाले.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काय म्हणाले?**

अनिल सोले हे वरिष्ठ नेते आहेत. नागपुरात भाजपच्या जडणघडणीमध्ये त्यांचा वाटा राहिला आहे. कार्यकर्त्यांना सांभाळण्याचा काम अनिल सोले करत आले आहेत. अनिल सोले यांनी सांगितले होते की पक्षाबद्दल त्यांची नाराजी नाही. तर कार्यपद्धतीबद्दल नाराजी असल्याचे सांगितले होते. त्यांची नाराजी कुठल्या निर्णयाबद्दल नव्हती, तर निर्णयाची प्रक्रिया कशी होते त्याबद्दल होती. निर्णय करताना जास्तीत जास्त लोकांशी बोलून निर्णय केले



पाहिजे असे त्यांचे म्हणणे होते. आम्ही त्यांच्या तक्रारींची नोंद घेतली आणि पक्षाच्या कार्यपद्धतीत बदल करू असे ठरवले आहे असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

आम्हाला खात्री होती की अनिल सोले राग असला तरी पक्षापासून दूर जाणार नाहीत. अनिल सोले यांचा दुसरा मुद्दा अनेक वरिष्ठ कार्यकर्त्यांकडे सध्या पक्षाची कुठलीही जबाबदारी नाही, कुठलाही काम नाही, त्यांच्याकडे दुर्लक्ष होत आहे अशी होती. त्या संदर्भात चर्चा करुन अनेक वर्षे पक्षाचा काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना काही जबाबदाऱ्या देण्याचा निर्णय आम्ही केला आहे. एवढे वर्ष अनिल सोले यांनी कधीही पक्षा विरोधात भूमिका घेतली नाही. उलट नाराजांना समजावण्याची जबाबदारी ते बजवायचे.

त्यामुळे आम्हाला खात्री होती की अनिल सोले राग असला तरी पक्षापासून दूर जाणार नाहीत. ते पक्षासोबतच राहतील. त्यांनी आज तसाच निर्णय करत भाजपचे उमेदवार पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे.

गिरीश व्यास यांचीही नाराजी होती. त्यांच्याशी चर्चा झाली. त्यांनीही राजीनामा मागे घेतला आहे.

# अंबाबाई मंदिरात पुजाऱ्यांचे आंदोलन; प्रशासनाच्या हस्तक्षेपावरून वाद

**कोल्हापूर :** कोल्हापूरच्या प्रसिद्ध अंबाबाई मंदिरात पुजा-यांनी प्रशासनाच्या भूमिकेविरोधात ठिय्या आंदोलन सुरू केल्याने मंदिर परिसरात एकच विषय सुरु झाला आहे. मंदिरातील धार्मिक विधी, पारंपरिक पूजा आणि प्रशासनाचा हस्तक्षेप या मुद्यांवरून पुजा-यांनी नाराजी व्यक्त केली आहे. या आंदोलनामुळे मंदिर व्यवस्थापन आणि धार्मिक परंपरांचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. मंदिरातील धार्मिक विधी आणि परंपरांमध्ये प्रशासनाकडून अतिरिक्त हस्तक्षेप केला जात असल्याचा आरोप पुजा-यांनी केला आहे. अशा हस्तक्षेपामुळे पारंपरिक पद्धतीने पूजा करण्यास अडचणी निर्माण होत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे प्रशासनाने धार्मिक परंपरांचा विचार करून निर्णय घ्यावेत, अशी भूमिका आंदोलक पुजाऱ्यांनी घेतली आहे.

या आंदोलनामागे मंदिरातील काही विशिष्ट घटनांचाही संदर्भ असल्याचे सांगितले जात आहे. देवीच्या मूर्तीशी संबंधित तसेच दर्शन व्यवस्थेबाबत घडलेल्या काही प्रसंगांमुळे पुजाऱ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. याशिवाय, पोलिसांच्या वागणुकीवरही पुजा-यांनी आक्षेप घेतला आहे. कर्मचारी किंवा पोलिसांच्या भूमिकेची दखल घेऊन योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी पुजाऱ्यांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, या प्रकरणावरून मंदिर परिसरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. परिस्थिती हाताळण्यासाठी पोलीस प्रशासन आणि आंदोलक पुजारी यांच्यात चर्चा सुरू असल्याचे समोर आले आहे.

संपादकीय लेखणीतून...

# पक्ष्यांचे स्थलांतर

जागतिक स्थलांतरित पक्षी दिवस हा दरवर्षी दोन वेळा साजरा केला जातो झ्र एकदा मे महिन्यात आणि दुसऱ्यांदा ऑक्टोबर महिन्यात. हा दिवस स्थलांतर करणाऱ्या पक्ष्यांच्या संरक्षणाची महत्त्वाची जाणीव करून देतो. स्थलांतर करणारे पक्षी आपल्या जगात महत्त्वाची भूमिका बजावतात, कारण ते वातावरणातील बदल, हवामान आणि परिसंस्था यांचा संकेत देतात. या दिवसाच्या माध्यमातून जागतिक स्तरावर पक्ष्यांच्या स्थलांतराच्या प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी, त्यांची निवासस्थानं, अन्नाची कमतरता, आणि मानवी हस्तक्षेपामुळे निर्माण होणारे धोके यावर लक्ष केंद्रित केले जाते. सन २०२४ मध्ये या दिवसाची थीम 'जल आणि स्थलांतरित पक्षी' आहे, ज्यामध्ये पाणी आणि त्याच्या गुणवत्ता आणि संरक्षणाचा स्थलांतर करणाऱ्या पक्ष्यांवर होणारा परिणाम दर्शवला जातो.

जागतिक स्थलांतरित पक्षी दिवस पक्षीसंवर्धनासाठी महत्त्वाचा आहे, ज्यामुळे जागरूकता वाढवून पक्ष्यांचे जीवन रक्षण करण्यासाठी अनेक उपक्रम आयोजित केले जातात. स्थलांतरित पक्षी म्हणजे अन्न शोधण्यासाठी, अनुकूल हवामानासाठी किंवा वीण (अंडी घालणे) करण्यासाठी दरवर्षी ठराविक ऋतूत एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात प्रवास करणारे पक्षी होय. उत्तर गोलार्धात हिवाळा सुरू झाल्यावर अन्नाचा तुटवडा निर्माण होतो आणि कडाक्याची थंडी पडते, त्यामुळे हे पक्षी दक्षिणकडील उष्ण किंवा समशीतोष्ण प्रदेशांकडे येतात. भारतात दरवर्षी सुमारे २९ देशांतून साधारण ३७० प्रजातीचे स्थलांतरित पक्षी येतात. सप्टेंबर ते ऑक्टोबर दरम्यान हे पक्ष्यांचे थवे भारतात पोहोचू लागतात. पक्षी प्रामुख्याने मध्य आशियाई उड्डाणमार्ग सारख्या विशिष्ट मार्गांचा वापर करतात. भारतातील काही प्रसिद्ध स्थलांतरित पक्षी- रोहित- फ्लेमिंगो : गुलाबी रंगाचे सुंदर पक्षी जे अन्नाच्या शोधात पाणथळ जागांवर किंवा समुद्रकिनाऱ्यांवर येतात.

सायबेरियन क्रेनः सायबेरियाच्या थंड प्रदेशातून हिवाळ्यात भारताच्या केवलादेव राष्ट्रीय उद्यानात येतात.

बार-हेडेड गीझ (पहाडी हंस): मध्य आशियातून हिमालयाचा उच्च उंच प्रदेश ओलांडून भारतात येणारा पक्षी.

नॉर्दर्न पिनटेलः बदकांच्या प्रजातीतील हा पक्षी युरेशिया आणि उत्तर भागातून भारतात थव्याने येतो.

गुलाबी पेलिकनः युरोपमधून उत्तर भारताच्या पाणथळ प्रदेशात स्थलांतर करतो. काही स्थलांतरित पक्षी बघायचे असल्यास जाणा पक्ष्यांचे स्थलांतर ही पक्षिजीवनामधली एक विलक्षण घटना आहे. पक्षी खाद्यासाठी, हवामान बदलामुळे तसेच पिल्लांच्या प्रशिक्षणासाठीही स्थलांतर करतात. सदा सर्वकाळ अनुकूल परिस्थिती लाभण्यासाठी वसतिस्थानात नियमितपणे आणि आलटून पालटून केलेला बदल म्हणजे स्थलांतर अशी व्याख्या लॅण्ड्सबरो थॉम्सन या शास्त्रज्ञाने केली आहे. स्थलांतरादरम्यान पक्षी मूळ वसतिस्थान ते हिवाळी मुक्काम आणि परत मूळ वसतिस्थान, असा प्रवास करतात.

चक्रवाक पक्षी हिवाळ्यात भारताच्या दक्षिण भागात स्थलांतर करतात. आर्क्टिक टर्न हा पक्षी सर्वांत मोठे स्थलांतर करतो. तो उत्तर ध्रुव ते दक्षिण ध्रुव व परत उत्तर ध्रुव असा जवळ जवळ ३६ हजार कि.मी.चा प्रवास एका वर्षात करतो. सुमारे १५९ प्रजातींचे पक्षी स्थलांतर करून भारतात येतात. त्यामधे थापट्या नकटा, शेंडीबदक, लालसरी, थोरले व धाकटे मराल, तरंग, गडवाल, चक्रवाक ही बदके तसेच कादंब व पट्टकादंब हे गूज येतात. चमचा, अवाक, तुतवार, शेकाट्या, कारंडव, उचाट, सोनचिलखा, कुरव असे पाणथळीचे पक्षीही येतात. तसेच गप्पीदास, कस्तुर, शंकर, धोबी, क्रौंच या पक्ष्यांबरोबरच दलदल ससाणा, शिक्रा, कवड्या हारिण, तीसा, श्येन कुकरी, खरुची हे शिकारी पक्षीही येतात.

उत्तर गोलार्धात हिवाळ्यात निर्माण होणारा खाद्याचा तुटवडा हे तेथील पक्ष्यांच्या स्थलांतराचे प्रमुख कारण असते असे काही पक्षिशास्त्रज्ञांचे मत आहे. अलीकडील संशोधनातून असे सूचित होते, की पक्ष्यांच्या स्थलांतराला दिवसाच्या कालावधीतील बदल कारणीभूत होतो. दिवस जसा लहान अथवा मोठा होतो तसा त्याचा पक्ष्यांच्या शरीरातील पीयूष आणि पिनीअल ग्रंथींवर परिणाम होतो. त्यामुळे पक्षी अस्वस्थ होतात आणि योग्य वेळ आली की स्थलांतराचा प्रवास सुरू करतात.

निओ आर्क्टिक - निओ ट्रॉपिकल हवाई मार्ग - पक्ष्यांचे स्थलांतर उत्तर आणि दक्षिण अमेरिकेदरम्यान होते. ब) युरेशियन - आफ्रिकन हवाई मार्ग - युरोप, आशिया आणि आफ्रिका या खंडांच्या दरम्यान होणारे स्थलांतर. क) ऑस्ट्रेलियन हवाई मार्ग - दक्षिण पूर्व आशिया आणि ऑस्ट्रेलिया या दरम्यान होणारे स्थलांतर. ड) पेलॅजिक हवाई मार्ग - समुद्रावर होणारे स्थलांतर. भारतीय उपखंडात दोन मार्गांनी पक्षी स्थलांतर करून येतात. त्यातील सर्वात महत्त्वाचा मार्ग हा इंडस व्हॅली मार्ग म्हणून ओळखला जातो. हा आंतरराष्ट्रीय मान्यता मिळालेला, पाणथळीच्या पक्ष्यांचा चौथ्या क्रमांकाचा मार्ग म्हणून ओळखला जातो. भारतात येणारे बहुतेक पक्षी या मार्गाने येतात.

# नोबेलची 'न्याय' झेप : न्यायमूर्ती नावी पिल्लई

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
**वर्धा**

नॉर्वेजियन नोबेल समितीने ९ ऑक्टोबर २०२६ रोजी ओस्लो येथे आंतरराष्ट्रीय कायदा, जागतिक शांतता आणि मानवी हक्कांच्या रक्षणासाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या दक्षिण आफ्रिकेच्या ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ न्यायमूर्ती नवनीतनेम 'नावी' पिल्लई यांना २०२६ चा प्रतिष्ठित शांततेचा नोबेल पुरस्कार जाहीर केला. ९ ऑक्टोबर २०२६ रोजी झालेली ही घोषणा समकालीन जागतिक पटलावर अत्यंत निर्णायक आणि ऐतिहासिक मानली जात आहे. जगभरात वाढता भूराजकीय तणाव, युद्धजन्य परिस्थिती आणि आंतरराष्ट्रीय संस्थांच्या अधिकारांवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असताना, नोबेल समितीने ८५ वर्षीय नावी पिल्लई यांची केलेली निवड शांततेच्या मूलभूत व्याख्येकडे जगाचे लक्ष वेधून घेते. शाश्वत शांतता ही केवळ शस्त्रांची अनुपस्थिती अथवा तात्पुरती शस्त्रसंधी नसते, तर ती मानवी प्रतिष्ठा, निष्पक्ष न्यायव्यवस्था आणि कायद्याच्या सार्वभौम राज्यावर आधारलेली असली पाहिजे, हा ठाम विचार या पुरस्काराच्या माध्यमातून अधोरेखित झाला आहे. आंतरराष्ट्रीय न्यायालयाने दिलेली कायदेशीर संरक्षणे प्रत्यक्ष जमिनीवरील पीडितांपर्यंत पोहोचवणारा दीपस्तंभ म्हणून त्यांच्या संपूर्ण जीवनप्रवासाचा हा सर्वोच्च गौरव ठरला आहे.

नावी पिल्लई यांच्या न्यायालयीन आणि मानवाधिकार लढ्याची बीजे दक्षिण आफ्रिकेतील अत्यंत भीषण अशा वर्णद्वेषी राजवटीच्या विरोधातून रोवली गेली. दक्षिण आफ्रिकेतील डर्बन शहरात एका सामान्य भारतीय तमिळ कुटुंबात जन्मलेल्या पिल्लई यांनी प्रचंड सामाजिक व राजकीय विषमतेवर मात करत शिक्षण पूर्ण केले. वर्ष १९६७ मध्ये दक्षिण आफ्रिकेच्या नाताल प्रांतात स्वतःची स्वतंत्र वकिली सुरू करणाऱ्या त्या पहिल्या कृष्णवर्णीय तथा गैर-श्वेत महिला वकील ठरल्या. तत्कालीन वर्णभेदी व्यवस्थेत न्यायाची दारे शोषितांसाठी बंद असताना, त्यांनी रॉबेन आयलंडवरील कुप्रसिद्ध तुरुंगात डांबून ठेवण्यात आलेल्या नेल्सन मंडेला यांच्यासह आफ्रिकन नॅशनल काँग्रेसच्या प्रमुख राजकीय कैद्यांसाठी निर्भीडपणे कायदेशीर लढा दिला. तुरुंगात पोलिसांकडून होणारा अनन्वित छळ रोखण्यासाठी त्यांनी ऐतिहासिक याचिका दाखल केल्या; तसेच बंदिवानांना वकिलांशी थेट संवाद साधण्याचा, वैद्यकीय उपचार मिळवण्याचा आणि कुटुंबाशी संपर्क प्रस्थापित करण्याचा मूलभूत कायदेशीर अधिकार मिळवून देण्यात त्यांनी निर्णायक भूमिका बजावली. दक्षिण आफ्रिकेत वर्णद्वेषाचा अंत झाल्यानंतर, वर्ष १९९५ मध्ये तत्कालीन राष्ट्राध्यक्ष नेल्सन मंडेला यांनी दक्षिण आफ्रिकेच्या उच्च न्यायालयात त्यांची न्यायाधीश म्हणून नियुक्ती केली आणि त्या देशाच्या उच्च न्यायालयात पोहोचणाऱ्या त्या पहिल्या गैर-श्वेत महिला न्यायाधीश ठरल्या.

देशांतर्गत स्तरावरून आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायव्यवस्थेत पदार्पण केल्यानंतर न्यायमूर्ती पिल्लई यांनी घेतलेले कायदेशीर निर्णय जागतिक न्यायशास्त्रात क्रांती घडवणारे ठरले. संयुक्त राष्ट्रसंघाने स्थापन केलेल्या रवांडा आंतरराष्ट्रीय गुन्हे लवादाच्या अध्यक्षा असताना, २ सप्टेंबर १९९८ रोजी त्यांनी 'जीन-पॉल अकायेसू' खटल्यात दिलेला निकाल जागतिक कायदेविषयक इतिहासात मैलाचा दगड ठरला. युद्धाच्या आणि वांशिक संघर्षाच्या काळात महिलांवर होणारा बलात्कार आणि लैंगिक अत्याचार हा केवळ वैयक्तिक हिंसाचार नसून तो सुनियोजित 'नरसंहार' आणि 'युद्धगुन्हा' आहे, अशी कायदेशीर व्याख्या प्रस्थापित करणारे हे जगातील पहिलेच निकालपत्र ठरले. या क्रांतिकारी योगदानानंतर, वर्ष २००३ मध्ये नेदरलँड्समधील हेग येथे नव्याने स्थापन झालेल्या आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायालयात त्यांची पहिल्या न्यायाधीश मंडळावर निवड झाली. वर्ष २००३ ते २००८ या कालावधीत त्यांनी आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाची संस्थात्मक रचना आणि जागतिक मानवाधिकार कायद्याचे निकष अत्यंत भक्कम केले.

२८ जुलै २००८ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत नवी पिल्लई यांची संयुक्त राष्ट्र मानवाधिकार उच्चायुक्त या सर्वोच्च पदावर निवड झाली आणि १ सप्टेंबर २००८ ते ३१ ऑगस्ट २०१४ या कालावधीत त्यांनी या पदाची धुरा सांभाळली. या सहा वर्षांच्या कार्यकाळात त्यांनी जगातील बड्या सत्तांचा राजकीय दबाव झुगारून युद्धग्रस्त प्रदेशांमधील निष्पाप नागरिकांचे रक्षण, वर्णभेद, जातीव्यवस्था, महिलांवरील अत्याचार आणि अल्पसंख्याकांच्या दडपशाहीविरोधात जागतिक पातळीवर निर्भीड भूमिका घेतली. म्यानमारमधील रोहिंग्या मुस्लिम समुदायावर झालेल्या लष्करी अत्याचारांवर त्यांनी सुरुवातीपासून आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर आवाज उठवला. रोहिंग्यांविरोधातील हिंसाचाराला केवळ देशांतर्गत संघर्ष न मानता तो 'वांशिक संहार' आणि 'मानवतेविरुद्धचा गुन्हा' असल्याचे त्यांनी संयुक्त राष्ट्रांच्या अहवालांतून ठामपणे मांडले. या अत्याचारांना जबाबदार असणाऱ्या म्यानमारच्या लष्करी नेतृत्वावर आंतरराष्ट्रीय न्यायालय आणि आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायालयात खटले चालवण्यासाठी कायदेशीर पुरावे आणि स्वतंत्र अहवाल सादर करण्यात त्यांची भूमिका अत्यंत मोलाची ठरली.

गेल्या काही काळापासून आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरी आणि विविध करारांच्या पार्श्वभूमीवर डोनाल्ड ट्रम्प यांच्या नावाची शांततेच्या नोबेलसाठी चर्चा आणि शिफारस सुरू होती. मात्र, नोबेल समितीने राजकीय प्रभावाऐवजी आंतरराष्ट्रीय मानवाधिकार आणि कायद्याच्या क्षेत्रात आयुष्यभर प्रत्यक्ष काम करणाऱ्या एका लढवय्या कायदेतज्ज्ञाची निवड करत नावी पिल्लई यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. डर्बनच्या सामान्य वस्तीतून सुरू झालेला, रॉबेन आयलंडच्या अंधाऱ्या कोठड्यांतील कैद्यांना न्याय मिळवून देणारा आणि हेग व जिनेव्हामधील आंतरराष्ट्रीय न्यायाधिकरणांपर्यंत पोहोचलेला नावी पिल्लई यांचा जीवनप्रवास हा सत्तेपेक्षा कायद्याचे अधिष्ठान मोठे असते हेच सिद्ध करतो. आंतरराष्ट्रीय कायदे हे केवळ आंतरराष्ट्रीय मंचांवरील चचेर्चे विषय न राहता, ते पृथ्वीवरील प्रत्येक शोषिताचे आणि निर्वासिताचे कायदेशीर संरक्षक कवच बनले पाहिजेत, हा वस्तुनिष्ठ संदेश त्यांच्या संपूर्ण कार्यातून आणि या नोबेल सन्मानातून जगाला मिळतो.

१० डिसेंबर रोजी ओस्लो येथे होणाऱ्या एका विशेष समारंभात नावी पिल्लई यांना हा पुरस्कार अधिकृतपणे प्रदान करण्यात येणार आहे. भारतीय वंशाच्या एका ज्येष्ठ महिलेला हा सर्वोच्च जागतिक बहुमान मिळाल्यामुळे जगभरातील भारतीय समुदाय आणि मानवाधिकार संघटनांकडून त्यांचे स्वागत केले जात आहे.

- ९५६१५९४३०६

# तिसऱ्या टी-ट्वेंटी सामन्यात भारताने फासे पलटवत मालिकेत घेतली आघाडी

**डॉ.दत्ता विघावे**
**क्रिकेट समिक्षक**

अभिषेक शर्माच्या (६९) धडाकेबाज खेळीच्या आणि त्यानंतर अर्शदीप सिंग व नमन धीर यांच्या गोलंदाजीच्या जोरावर भारताने रविवारी इंदूर येथे झालेल्या तिसऱ्या टी२० सामन्यात वेस्ट इंडिजवर १४ धावांनी विजय मिळवत पाच सामन्यांच्या मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली. प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाने २० षटकांत सर्व गडी गमावून २२३ धावा केल्या. रांची येथे खेळल्या गेलेल्या दुसऱ्या टी-२० सामन्यात २५० धावांचा पाठलाग करताना २२४ धावांचे लक्ष्य वेस्ट इंडिजसाठी सोपे वाटत होते. तथापि, भारतीय गोलंदाजांनी अचूक गोलंदाजी करत पाहुण्या संघाला सामना जिंकू दिला नाही. दवबिंदूंनीही भारतीय गोलंदाजांना साथ दिली. वेस्ट इंडिजचा संघ २० षटकांत ७ गडी गमावून केवळ २०९ धावाच करू शकला.

**अभिषेकची बॅट गर्जली**

यानंतर, भारतीय फलंदाजांनी, विशेषतः अभिषेक शर्माने, आक्रमक पवित्रा घेतला. होळकर स्टेडियमच्या लहान मैदानावर, ते इतक्या आत्मविश्वासाने फटके खेळत होते, जणू काही ते नेटमध्ये सराव करत आहेत. त्यांना पाहिजे तेव्हा ते चेंडू सीमारेषेबाहेर पाठवत होते. त्याने १८ चेंडूंमध्ये अर्धशतक पूर्ण करून आपला इरादा स्पष्ट केला. पण नाट्यमय घडामोडी अजून व्हायच्या होत्या. ११५ धावांवर एक गडी बाद असताना, भारतीय संघ मोठी धावसंख्या उभारण्याच्या तयारीत होता, पण पुढच्या १० चेंडूंमध्ये तीन गडी बाद झाल्याने सामन्याचे चित्रच पालटले. रॉस्टन चेस नवव्या षटकात गोलंदाजीसाठी परत आला आणि ईशान किशनने षटकार मारून त्याचे स्वागत केले. पण त्याने पुढच्याच चेंडूवर किशनला पुन्हा एकदा जाळ्यात अडकवले.

**चेसचा चौथा बळी**

जाळ्यात अडकलेला किशन पुढे झेप घेण्याचा प्रयत्न करत असताना यष्टीचीत झाला. टी-२० सामन्यात रॉस्टन चेसने किशनला बाद करण्याची ही चौथी वेळ होती. किशनने १८ चेंडूंमध्ये ३७ धावा केल्या आणि १०८ धावांची भागीदारी संपुष्टात आणली. त्याच षटकाच्या पाचव्या चेंडूवर, भारतीय कर्णधार श्रेयस अय्यरही एका धावेवर पायचीत झाला.

हे आश्चर्य अधिकच मोठे होते कारण श्रेयस फिरकीचा चांगला खेळाडू मानला जातो, पण तो एका सरळ चेंडूवर फसला. सर्वात मोठा धक्का पुढच्याच षटकात बसला, जेव्हा स्प्रिंगरच्या बाउन्सरवर अभिषेकचे टायमिंग चुकले. चेंडू बॅटच्या वरच्या कडेला लागला आणि इतर अनेक गोलंदाजांनी तो हवेतच झेलला, ज्यामुळे त्याची शानदार खेळी संपुष्टात आली. अभिषेकने ३० चेंडूंमध्ये ६९ धावा करून प्रेक्षकांचे मनोरंजन केले.

अचानक मैदानावर शांतता पसरली, प्रेक्षकांच्या चेहऱ्यावर निराशा पसरली आणि सर्व आशा तिलक वर्मावर केंद्रित झाल्या. तिलक वर्मा (२०) जबाबदारीने खेळला आणि धावगती मंदावू दिली नाही. खालच्या फळीतील फलंदाजांनी मोठ्या धावसंख्येऐवजी जलद खेळीला प्राधान्य दिले. धावा कमी होत्या, पण संघाचा धावफलक पुढे सरकत राहिला.

**भारताची संथ सुरुवात**

लखनौ आणि रांची येथे खेळल्या गेलेल्या टी२० सामन्यांमध्ये, लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या संघाने विजय मिळवला आहे. तर, इंदूरमध्ये वेस्ट इंडिजच्या कर्णधाराने नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले. सलामीचा डाव इतका संथ होता की, जवळपास अडीच वर्षांत पहिल्यांदाच भारतीय संघाने पहिल्या दोन षटकांत एकही चौकार मारला नाही. नितीश रेड्डीने २१, अक्षर पटेलने २०, अर्शदीप सिंगने ११ आणि प्रिन्स यादवने १३ धावा नाबाद केल्या. कॅरिबियन वेगवान गोलंदाज अधिक प्रभावी ठरले. त्यांनी एकूण १२ षटके गोलंदाजी करत १४२ धावांत पाच बळी घेतले, तर फिरकी गोलंदाजांनी आठ षटके गोलंदाजी करत ७५ धावांत तीन बळी घेतले.

यापूर्वी असे जानेवारी २०२४ मध्ये बंगळूरु येथे अफगाणिस्तानविरुद्धच्या टी२० सामन्यात घडले होते. तेव्हापासून संघाने ७७ सामने खेळले आहेत. दुसऱ्या षटकात एक मोठा धक्का बसला, जेव्हा संजू सॅमसनने (३) शेमार जोसेफच्या १५०.८ किमी प्रतितास वेगाच्या चेंडूला फ्लिक करण्याचा प्रयत्न केला आणि मिडविकेटला उभ्या असलेल्या निकोलस पूरनने सोपा झेल दिला.

**विक्रमांवर एक नजर**

अभिषेक टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वात जलद २००० धावा करणारा फलंदाज ठरला. त्याने हा पराक्रम १०२४ चेंडूंमध्ये केला. अभिषेकने २० पेक्षा कमी चेंडूंमध्ये अर्धशतक पूर्ण करण्याची ही आठवी वेळ आहे. इतर कोणत्याही फलंदाजाने तीनपेक्षा जास्त वेळा ही कामगिरी केलेली नाही. अभिषेकने आपल्या टी-२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत अर्धशतक झळकावण्याची ही १४ वी वेळ आहे. या मालिकेतील हे त्याचे पहिले अर्धशतक आहे.

**तिलक वर्मा विचित्ररित्या धावबाद**

ही घटना तेव्हा घडली जेव्हा गुडकेश मोती वेस्ट इंडिजकडून गोलंदाजी करत होते. त्याचा खाली झुकलेला फुलटॉस चेंडू अक्षर पटेलने डीप स्क्वेअरच्या दिशेने खेळला आणि तिथे असलेल्या कामिल पूरनने चेंडू सीमारेषेच्या बाहेर जाऊ न देण्यासाठी अप्रतिम प्रयत्न केला. चेंडू चौकार गेला असे तिलक आणि अक्षर यांना वाटले आणि एक धाव पूर्ण केल्यानंतर, त्यांनी आणखी धावा न घेता खेळपट्टीच्या मध्यभागी एकत्र उभे राहिले.

दुसरीकडे, पूरनने प्रथम अक्षरच्या एंडला चेंडू फेकला पण पटेल आधीच क्रीजवर पोहोचला होता. त्यानंतर शाई होपने दुसऱ्या टोकाला असलेल्या मोतीकडे चेंडू फेकला. त्यावेळी तिलकला धोक्याची जाणीव नव्हती, पण मोतीने वेळ न घालवता चेंडूने यष्टी उडवल्या. त्यानंतर तिसऱ्या पंचांनी निर्णयाचे पुनरावलोकन केले आणि तिलक धावबाद झाल्याचे निश्चित केले. ते १६ चेंडूंमध्ये २८ धावा करून बाद झाले.

आता मालिकेतले दोन सामने बाकी असून भारताने यापैकी एक जरी सामना जिंकला तरी मालिका भारताच्या झोळीत पडेल. मात्र भारत दौऱ्यावर आलेला विंडीज संघ जोमाने प्रतिकार करत असल्याने भारताला ते आपले मनसुबे सहजासहजी पूर्ण करू देतील असे नाही.

- ९०९६३७२०८२

# आपत्ती जोखीम व्यवस्थापन: मानवतेवरील दुष्परिणाम हरण

**कृष्णकुमार निकोडे**
**गडचिरोली**

आपत्ती जोखीम कमी करण्यासाठी हा आंतरराष्ट्रीय दिवस आहे, या दिवसाचे उद्दिष्ट म्हणजे आपत्तींचा धोका कमी करण्यासाठी जनजागृती करणे आणि समाजाला अधिक सक्षम बनवणे. नैसर्गिक आपत्ती जसे की पूर, भूकंप, चक्रीवादळ, वणवे आणि दुष्काळ यामुळे मानवी जीवन, मालमत्ता आणि पर्यावरणावर मोठे नुकसान होते. असा आपत्ती धोका कमी करण्यासाठी वेळेवर उपाययोजना, आपत्कालीन तयारी आणि पुनर्बांधणी यांचा समावेश होतो. या दिवसाचे उद्दिष्ट लोकांना सुरक्षित आणि सुदृढ जीवन देण्याच्या दिशेने काम करणे आहे, जेणेकरून आपत्तींचा धोका कमी होऊन मानवतेवर त्याचा दुष्परिणाम कमी होईल.

या दिवसाच्या माध्यमातून जागतिक स्तरावर सरकारे, संस्था, आणि नागरिक यांना आपत्ती व्यवस्थापनाच्या योजना तयार करण्याचे महत्त्व पटवले जाते. सन २०२४ च्या थीमनुसार, आपत्तींचा प्रभाव कमी करण्यासाठी उपाययोजना, यामध्ये तांत्रिक उपाय, शाश्वत बांधकाम आणि सामुदायिक सहभाग महत्त्वाचे मानले जाते.

आपत्ती आणि जोखीम निवारण म्हणजे संभाव्य नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्तींचा धोका, त्यांची तीव्रता आणि त्यामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी केलेली शास्त्रशुद्ध पूर्वतयारी आणि उपाययोजना होय।

आपत्ती आणि जोखीम यासंबंधी महत्त्वाच्या संकल्पना- आपत्ती / विपत्तीः निसर्गात वा समाजात घडणारी अशी दुर्मिळ किंवा टोकाची घटना ज्यामुळे जीवित, मालमत्ता आणि पर्यावरणाचे मोठे नुकसान होते. उदा. भूकंप, पूर, वादळ, भूस्खलन इत्यादी. असुरक्षितताः एखाद्या व्यक्तीची, समाजाची किंवा संरचनेची अशी स्थिती, जी आपत्तीचा मुकाबला करण्याची क्षमता कमी करते. जोखीम : आपत्ती घडण्याची शक्यता आणि त्यामुळे होणाऱ्या हानीचे प्रमाण यांचे गणितीय किंवा संभाव्य स्वरूप. क्षमताः आपत्तीचा सामना करण्यासाठी आणि त्यावर मात करण्यासाठी उपलब्ध असलेली संसाधने, कौशल्य आणि ताकद।

आपत्ती जोखीम निवारणाची प्रमुख उद्दिष्टे- आपत्तीची शक्यता आणि तीव्रता कमी करणे. जीवितहानी आणि आर्थिक नुकसान जास्तीत जास्त टाळणे. समुदायाची आपत्ती सहन करण्याची किंवा सावरण्याची क्षमता वाढवणे. पूर्वसूचना प्रणाली आणि तंत्रज्ञानाचा वापर करून वेळेवर कृती करणे. आपत्ती व्यवस्थापनाचे प्रमुख टप्पे- (१) आपत्तीपूर्व तयारी : आपत्ती येण्यापूर्वी केले जाणारे नियोजन, रंगीत तालीम आणि आपत्ती प्रतिसाद दल सज्ज ठेवणे. (२) प्रतिबंध व तीव्रता कमी करणे : धोकादायक बांधकामांना प्रतिबंध करणे, पर्यावरणपूरक रचना करणे आणि जोखीम-युक्त नियोजन करणे. (३) प्रतिसाद : आपत्ती आल्यानंतर त्वरित बचावकार्य सुरू करणे, लोकांना सुरक्षित स्थळी हलवणे आणि अन्न-पाणी पुरवणे. (४) पुनर्वसन आणि पुनर्बांधणी : उद्ध्वस्त झालेली घरे, रस्ते, वीज आणि इतर पायाभूत सुविधांची पुन्हा उभारणी करणे आणि बाधित लोकांना पुन्हा सक्षम करणे.

अधिक माहितीसाठी आपण महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊ शकता.

आपत्ती जोखीम कमी करण्याचा उद्देश, आपत्ती घडण्याची शक्यता कमी करणे हा आहे. या दृष्टिकोनाला डीआरआर किंवा आपत्ती जोखीम व्यवस्थापन असेही म्हणतात. जेव्हा आपत्ती येतात, तेव्हा त्या कमी नुकसानकारक ठरतील, हे देखील त्याचे उद्दिष्ट आहे. डीआरआरचा उद्देश समुदायांना अधिक मजबूत आणि आपत्ती हाताळण्यासाठी अधिक चांगल्या प्रकारे तयार करणे हा आहे. तांत्रिक भाषेत सांगायचे झाल्यास, त्यांना अधिक लवचिक किंवा कमी असुरक्षित बनवणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. जेव्हा डीआरआर यशस्वी होते, तेव्हा ते समुदायांना कमी असुरक्षित बनवते, कारण ते आपत्तींचे परिणाम कमी करते. याचा अर्थ असा की डीआरआर धोकादायक घटना कमी आणि कमी तीव्र करू शकते. हवामान बदलामुळे हवामानाशी संबंधित धोके वाढू शकतात. त्यामुळे विकास प्रयत्नांमध्ये अनेकदा डीआरआर आणि हवामान बदल अनुकूलन यांचा एकत्रितपणे विचार केला जातो. सन २०११ मधील काही देशांसाठी आपत्ती जोखीम कमी करण्याच्या प्रगतीचा स्कोअर ५ चा स्कोअर सर्वोत्तम आहे. मूल्यांकनांमध्ये चार निर्देशकांचा समावेश आहे, जे देशांनी आपत्ती जोखीम कमी करण्याला आणि संबंधित संस्थांच्या बळकटीकरणाला कितपत प्राधान्य दिले आहे? हे दर्शवतात. विकास आणि मानवतावादी कार्यांच्या जवळजवळ सर्व क्षेत्रांमध्ये आपत्ती जोखीम कमी करण्याचा- डीआरआरचा समावेश करणे शक्य आहे. स्थानिक समुदाय, एजन्सी किंवा संघीय सरकारमधील लोक डीआरआर धोरणे प्रस्तावित करू शकतात. या धोरणांचे उद्दिष्ट "विविध कालखंडांमध्ये आणि ठोस लक्ष्य, निर्देशक आणि कालमर्यादेसह ध्येये आणि उद्दिष्ट्ये परिभाषित करणे" हे आहे. यशस्वी आपत्ती जोखीम कमी करण्याच्या डीआरआर प्रयत्नांमध्ये काही आव्हाने आहेत. स्थानिक समुदाय आणि संस्थांनी नियोजन प्रक्रियेत सक्रियपणे सहभागी असले पाहिजे. वय हा देखील एक अडथळा ठरू शकतो, कारण लहान मुले आणि तरुणांच्या गरजांकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. स्थानिक सरकारची भूमिका आणि निधीपुरवठा यांचाही विचार करणे आवश्यक आहे. याव्यतिरिक्त आपत्ती जोखीम कमी करण्याच्या डीआरआर धोरणांनी लिंगभावाचा विचार केला पाहिजे.

- ९६९९८३६७१७

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# अतिक्रमणामुळे सावरगावातील रस्त्याचे काम अपूर्ण राहण्याची शक्यता !

**सार्वजनिक बांधकाम विभागाचे रस्त्यालगत गट्टू बसविण्याचे काम रखडले, अतिक्रमण हटविण्याबाबत ग्रामपंचायतीचा टाळाटाळ होत असल्याचा नागरिकांचा आरोप**

**दै. सिंहवाणी वृत्त, अतुल दंढारे- नरखेड**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत मंजूर झालेल्या पूल व रस्त्याचे काम सध्या सावरगाव येथे सुरू आहे. पुलाचे काम पूर्ण झाले असून, रस्त्याचे कामही जवळपास पूर्णत्वाकडे आले आहे. रस्त्याच्या बाजूला गट्टू बसविण्याचे काम सुरू असतानाच काही ठिकाणी झालेल्या अतिक्रमणामुळे या कामात अडथळे निर्माण होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. संबंधित अतिक्रमण हटविण्यासाठी ग्रामपंचायत प्रशासनाने ठोस कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून वारंवार करण्यात येत आहे. मात्र, याकडे ग्राम पंचायत दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

रस्त्याचे काम अंतिम टप्प्यात, मात्र अतिक्रमणाचा प्रश्न कायम

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून सावरगाव येथे पूल व सिमेंट रस्त्याच्या कामाला मंजुरी मिळाल्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली. पुलाचे काम पूर्ण झाले असून, रस्त्याचे कामही जवळपास पूर्ण झाले आहे. सध्या रस्त्याच्या बाजूला गट्टू बसविण्याचे काम सुरू आहे. मात्र, रस्त्यालगत काही नागरिकांनी अतिक्रमण केल्यामुळे गट्टू बसविण्याच्या कामात अडथळे येत आहे.

विकासकामे पूर्ण झाल्यानंतर त्यांचा लाभ गावातील नागरिकांना मिळणे अपेक्षित असताना, अतिक्रमणामुळे काम अपूर्ण राहिल्यास सार्वजनिक निधीतून सुरू असलेल्या या कामाचा अपेक्षित परिणाम साधला जाणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

**ग्रामपंचायतीकडे वारंवार मागणी, तरीही कारवाई का नाही ?**

रस्त्यालगत असलेले अतिक्रमण हटवून गट्टू बसविण्याचे काम सुरळीतपणे पूर्ण करावे, यासाठी नागरिकांनी ग्रामपंचायत सावरगाव येथे वारंवार मागणी



केल्याचे समजते. मात्र, प्रशासक व सचिव यांच्याकडून कुठलीही ठोस कार्यवाही होत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

अतिक्रमणधारकांना नोटिसा दिल्याचे ग्रामपंचायत प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे. मात्र, नोटिसा दिल्यानंतरही प्रत्यक्ष अतिक्रमण का हटविण्यात आले नाही, असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. या संदर्भात ग्राम पंचायत प्रशासनास विचारणा केली असता समाधानकारक उत्तर मिळत नसून, उडवाउडवीची उत्तरे दिली जात असल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे.

**सचिवावर आमदारांच्या कार्यकर्त्यांचा दबाव ?**

या प्रकरणाला आणखी एक वेगळे वळण मिळाले आहे. अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईसाठी गेल्यानंतर आमदारांचे काही कार्यकर्ते आमदारांना जाऊन भेटतात आणि अतिक्रमण हटवू नये यासाठी आमदारांना फोन करण्यास सांगून कारवाई थांबविण्याचा प्रयत्न करतात, असे सचिव सांगत असल्याचा दावा काही नागरिकांकडून करण्यात येत आहे.

मात्र, या कथित दबावाबाबत नेमकी वस्तुस्थिती काय आहे, संबंधित व्यक्तींची भूमिका काय आहे आणि प्रत्यक्षात कारवाई कोणत्या कारणामुळे थांबली आहे, याची अधिकृत पडताळणी होणे आवश्यक आहे. या आरोपांवर संबंधित आमदार, त्यांच्या कार्यकर्त्यांची तसेच ग्रामपंचायत प्रशासनाची अधिकृत भूमिका समोर येणेही महत्त्वाचे आहे.

**विकासकामात अडथळे निर्माण होऊ नयेत, नागरिकांची मागणी**

गावातील रस्ते, पूल आणि इतर पायाभूत सुविधांची कामे ही नागरिकांच्या सोयीसाठी केली जातात. अशा कामांच्या अंमलबजावणीत अतिक्रमणामुळे अडथळे निर्माण होत असतील, तर संबंधित विभागाने नियमानुसार कार्यवाही करून प्रश्न मार्गी लावणे गरजेचे आहे. अतिक्रमणाच्या प्रश्नामुळे रस्त्यालगत गट्टू बसविण्याचे काम अपूर्ण राहू नये, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.

ग्रामपंचायत प्रशासनाने केवळ नोटिसा दिल्याचे सांगण्यापेक्षा नियमानुसार पुढील कार्यवाही करावी, अतिक्रमणाच्या प्रश्नावर स्पष्ट भूमिका मांडावी आणि सार्वजनिक बांधकाम विभागाशी समन्वय साधून उर्वरित काम पूर्ण होण्यासाठी सहकार्य करावे, अशी मागणी होत आहे.

**प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष**

सावरगावातील या रस्त्याचे काम पूर्ण होण्यासाठी अतिक्रमणाचा प्रश्न निकाली काढणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे ग्रामपंचायत प्रशासक व सचिव या प्रकरणात नेमकी कोणती कार्यवाही करणार, अतिक्रमण हटविण्याबाबत दिलेल्या नोटिसांचे पुढे काय झाले आणि रस्त्यालगत गट्टू बसविण्याचे काम कधी पूर्ण होणार, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

संबंधित प्रशासनाने या प्रकरणात पारदर्शक भूमिका घेऊन वस्तुस्थिती स्पष्ट करावी आणि विकासकामातील अडथळे दूर करण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी आता नागरिकांकडून होत आहे.

## प्लास्टिक मुक्त अभियानासाठी दिव्यांग मुलांची जनजागृती रॅली, 'स्नेह सदन' विद्यालयाचा स्तुत्य उपक्रम



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

आज प्लास्टिक मुक्त अभियानाचे औचित्य साधून, 'स्नेह सदन बौद्धिक अक्षम मुलांची विशेष अनिवासी शाळा' येथील दिव्यांग विद्यार्थ्यांनी समाजात प्लास्टिक बंदीबाबत जनजागृती करण्यासाठी एक भव्य रॅली काढली. आपल्या शारीरिक आणि बौद्धिक मर्यादांवर मात करत, या विशेष मुलांनी पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि निसगार्चे सौंदर्य जपण्यासाठी नागरिकांना प्लास्टिकचा वापर पूर्णपणे टाळण्याचे आवाहन केले. रॅली दरम्यान विद्यार्थ्यांनी हातात प्लास्टिक विरोधी संदेश देणारे फलक धरले होते. या रॅलीमध्ये मुलांनी दिलेली प्रमुख ब्रीदवाक्ये नागरिकांचे विशेष लक्ष वेधून घेत होती,

"प्लास्टिकचा वापर टाळा, निसर्गाचे सौंदर्य जपा आणि वाढवा !"

"पर्यावरण वाचवा, प्लास्टिक हटवा; वसुंधरेला सुंदर बनवा !" या मोहिमेचे नेटके नियोजन शाळेचे मुख्याध्यापक पंकज पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. रॅली यशस्वी करण्यासाठी विशेष शिक्षक प्रीतम मानकर, प्रदीप बागडे, सविता आतकर, आणि प्रिया राजुरिया यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच या स्तुत्य उपक्रमात वस्तीगृह अधीक्षक अशोक पाटोळे, प्रवीण ठोंबरे, प्रवीण महाल्ले, परिचारिका सविता ढबाले, फिजिओथेरपिस्ट हर्षदा लोंढे आणि काळजीवाहक अमन दीक्षित, नितीन खेवले, अतुल घोडागाडे, अश्विनी वानखेडे, व मोहम्मद कुरेशी यांनी सक्रिय सहभाग नोंदवून रॅली यशस्वी करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. या विशेष मुलांचा पर्यावरणाप्रती असलेला उत्साह आणि संदेश पाहून परिसरातील नागरिकांनी व पालकांनी त्यांचे टाळ्यांच्या कडकडाटात कौतुक केले व प्लास्टिक न वापरण्याचा संकल्प केला.

## जिल्ह्याबाहेर चारा विक्री व वाहतुकीवर निर्बंध, दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जिल्हादंडाधिकारी कुमार आशीर्वाद यांचा आदेश

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** जिल्ह्यातील संभाव्य चारा टंचाई लक्षात घेता पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता कायम ठेवण्याच्या उद्देशाने नागपूर जिल्ह्यातील चाऱ्याची जिल्ह्याबाहेर विक्री व वाहतुकीवर निर्बंध घालण्यात आले आहेत. यासंदर्भात जिल्हादंडाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम १६३ अन्वये ८ ऑक्टोबर रोजी आदेश निर्गमित केला आहे. खरीप हंगामात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने राज्य शासनाने दुष्काळ जाहीर करून विविध उपाययोजना व सवलती लागू केल्या आहेत. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व १४ तालुक्यांचा समावेश दुष्काळाच्या निकषांत करण्यात आला आहे. पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा कमी राहिल्यामुळे जिल्ह्यात चारा उत्पादन अपेक्षेपेक्षा कमी होण्याची शक्यता आहे. जिल्ह्यात उत्पादीत होणारा चारा इतर जिल्ह्यांत तसेच सीमावर्ती भागांत मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी पाठविला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे भविष्यात जिल्ह्यात गंभीर चारा टंचाई निर्माण होऊन पशुधनाच्या संगोपनाचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. या परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासनाने चाऱ्याच्या विक्री व वाहतुकीवर निर्बंध घालण्याचा निर्णय घेतला आहे.

## नागपूर, गडचिरोली आणि रामटेक येथील तीन विद्यापीठांमध्ये दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ, भरलेले शुल्कही परत मिळणार!

**छात्रभारती विद्यार्थी संघटना आणि शिक्षक भारतीच्या पाठपुराव्याला यश, विद्यार्थ्यांना मोठा दिलासा**

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राज्यात दुष्काळाची परिस्थिती निर्माण झालेली असताना दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याचे आश्वासन राज्य सरकारने दिले होते. मात्र, शिष्यवृत्तीचे कारण पुढे करून काही विद्यापीठांमध्ये विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क वसूल केले जात होते. या प्रकाराविरोधात छात्रभारती विद्यार्थी संघटना आणि शिक्षक भारती संघटनेने पाठपुरावा केला. या पाठपुराव्याला यश आले असून, राष्ट्र संत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली आणि कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक या तीन विद्यापीठांमधील दुष्काळग्रस्त तालुक्यांतील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत.

नागपूर पदवीधर मतदारसंघातील शिक्षक भारतीचे उमेदवार अतुल देशमुख आणि छात्रभारती विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष अनिकेत घुले यांच्या सहकार्याने हा प्रश्न मार्गी लागला आहे. उच्च शिक्षण सहसंचालक, नागपूर विभागाचे डॉ. संतोष चव्हाण यांनी संबंधित तिन्ही विद्यापीठांना पत्र पाठवून दुष्काळग्रस्त तालुक्यांतील विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचे परीक्षा शुल्क आकारू नये, असे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

तसेच, ज्या विद्यार्थ्यांकडून यापूर्वी परीक्षा शुल्क वसूल करण्यात आले आहे, त्या विद्यार्थ्यांची माहिती संबंधित महाविद्यालयांनी तातडीने सादर करावी, असे आदेशही देण्यात आले आहेत. त्यामुळे यापूर्वी परीक्षा शुल्क भरलेल्या विद्यार्थ्यांना त्यांचे पैसे परत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

दुष्काळामुळे शेतकरी आणि सर्वसामान्य कुटुंबे आर्थिक संकटात सापडली आहेत. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांवर परीक्षा शुल्काचा अतिरिक्त आर्थिक भार टाकणे अन्यायकारक आहे. सरकारने परीक्षा शुल्क माफीची घोषणा केल्यानंतर तिची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक होते. छात्रभारती विद्यार्थी संघटना आणि शिक्षक भारती संघटनेने हा प्रश्न सातत्याने लावून धरल्यामुळे हजारो विद्यार्थ्यांना दिलासा मिळण्यास मदत झाली आहे.

दुष्काळग्रस्त तालुक्यांतील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबरोबरच यापूर्वी वसूल केलेले शुल्कही विद्यार्थ्यांना परत मिळावे, यासाठी संबंधित यंत्रणांनी तातडीने कार्यवाही करावी, अशी भूमिका छात्रभारती विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष अनिकेत घुले आणि शिक्षक भारतीचे नागपूर पदवीधर मतदारसंघातील उमेदवार अतुल देशमुख यांनी मांडली. या निर्णयामुळे नागपूर, गडचिरोली आणि रामटेक येथील संबंधित विद्यापीठांच्या कार्यक्षेत्रातील दुष्काळग्रस्त तालुक्यांमधील विद्यार्थ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे.

# अखेर निसतखेडा व परिसराच्या गावातील विद्यार्थ्यांसाठी सालवा येथील कनिष्ठ महाविद्यालयापर्यंत शिक्षण असणाऱ्या शाळेत जाण्यासाठी बस सेवा सुरू!

**शाळेच्या संचालक मंडळाच्या अनेक वर्षांच्या पाठपुराव्याला अखेर यश!, गावाच्या शैक्षणिक प्रगतीत आणखी एक मानाचा तुरा!, काट्याकुट्याच्या पायवाटेपासून ते एस.टी. बसेपर्यंतचा प्रवास!**

**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

२००० च्या दशकात ज्या शाळेत निसतखेडा व परिसरातील गावाच्या नागरिकांनी थंडीच्या कडाक्याच्या धुक्यात आणि पावसाळ्याच्या धो-धो पावसात, काटे-कुटे तुडवत, बांधाच्या धुरळ्यातून पायवाटेने चालत जाऊन शिक्षण पूर्ण केलं, आज त्याच शाळेत जाणाऱ्या त्या नागरिकांच्या लेकरांना तो त्रास सहन करावा लागू नये, त्यांना चांगलं शिक्षण मिळावं आणि ये-जा सोपी व्हावी, या एकाच ध्येयाने निसतखेडा व परिसराच्या गावातील नागरिकांनी



शाळेसाठी डांबरीरस्ता आणि एस. टी. महामंडळाची बस सेवा सुरू करण्यासाठी शाळेच्या संचालक मंडळाकडे, संबंधित लोकप्रतिनिधी व प्रशासन विभागाकडे सतत लेखी तक्रारी केले. शाळेच्या संचालक मंडळांनी संबंधित विभागाकडे याबाबत सतत पाठपुरावा केला. त्यांच्या सतत पाठपुराव्याला यश येऊन अखेर शनिवार (ता.१० ऑक्टोबर) पासून निसतखेडा व परिसराच्या गावातील विद्यार्थ्यांसाठी डांबरीरस्ते ही तयार झाले व बस सेवा सुरू झालेली आहे. सकाळी शाळेत जाण्यासाठी निलज( खंडाळा) - बोरी (सिंगारदीप)- नरसाळा- गांगनेर (हिवरा)- खंडाळा (गांगनेर)- निसतखेडा- खेडी - सालवा या मागार्ने तर सायंकाळी शाळा सुटल्यानंतर पुन्हा याच मार्गाने बस सेवा सुरू झालेली आहे.

या स्तुत्य उपक्रमाचे उद्घाटन निसतखेडा गावचे पोलिस पाटील प्रकाश महादुले यांच्या हस्ते व ग्रामपंचायत निसतखेडा सरपंच प्रज्ञा राहुल बावने यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी गावातील प्रतिष्ठित नागरिक बबन चव्हाण, गोविंद लोंडेकर, भोजराज बागडे, मनोज कामळी, मनीष कोसरे, हर्षल मेश्राम, शाळेतील विद्यार्थी वर्ग सह गावातील बाल गोपाल मंडळी उपस्थित होते.

रस्त्यांचे डांबरीकरण व त्या डांबरीकरण झालेल्या रस्त्यांवर आता बस सेवा सुरू झाल्याने निसतखेडा व परिसराच्या गावातील नागरिकांनी सालवा येथील शाळेच्या संचालक मंडळासह, एसटी महामंडळाचे, संबंधित लोकप्रतिनिधी, शासनाच्या संबंधित प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांचे व या प्रक्रियेला यश आणण्यासाठी सहकार्य केलेल्या सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले आहे.

**थोडक्यात**

## नरसाळा येथे यावर्षीपासून दुर्गाउत्सवाला सुरुवात



**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

आज रविवार (दि.११ऑक्टोबर) ला नरसाळा येथे माँ जगदंबा नवयुवक दुर्गा उत्सव मंडळतर्फे यावर्षीपासून हनुमान मंदिर परिसरात ढोल ताशे गजरात दुर्गा देवीची स्थापन करण्यात आली. त्याप्रसंगी गावकऱ्यांमध्ये उत्साह दिसून आला. मंडळाचे अध्यक्ष साहिल माहुरे, पदाधिकारी सुरेंद्र ढोबळे, ग्रा.पं. सदस्य परसराम घारड, उदय ठाकरे,स्वीजल माहुरे, श्रेयश शेळके, रोनित नागपुरे, विजय ठाकरे, प्रकाश ठाकरे, आर्यन ठाकरे, नीलकंठ घारड, कमलेश घारड, राजकुमार वकालकार, बाल्या शेळके, अरविंद ठाकरे सह गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मंडळाच्या वतीने अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

## अनुभवी कंत्राटी कामगारांना रोजगार द्या; थकीत वेतन व बोनस तातडीने अदा करा!

**२० ऑक्टोबरपर्यंत निर्णय न झाल्यास मुख्यमंत्री निवासस्थानासमोर आंदोलनाचा इशारा**

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महावितरणच्या वाशिम मंडळात ८ ते १२ वर्षे सेवा बजावलेल्या अनुभवी कंत्राटी तांत्रिक कामगारांना रोजगारात प्राधान्य द्यावे, नवीन भरती प्रक्रियेतील कथित गैरप्रकारांची निष्पक्ष चौकशी करावी, जुलै २०२६ पासूनचे थकीत वेतन आणि ऑक्टोबर २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीतील बोनस तातडीने अदा करावा, अशी मागणी तांत्रिक कामगार युनियन (५०५९) प्रणित तांत्रिक अप्रेंटिस, कंत्राटी कामगार असोसिएशनने केली आहे.

यापूर्वी आंदोलन व बेमुदत अन्नत्याग उपोषणानंतर प्रशासनाने सकारात्मक आश्वासने दिली होती. मात्र, त्यांची प्रभावी अंमलबजावणी झालेली नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे. अनुभवी कामगारांना डावलून नवीन भरती करण्याऐवजी उपलब्ध रिक्त जागांवर पात्र अनुभवी कामगारांना प्राधान्य द्यावे, तसेच कंत्राटी कामगारांना विमा संरक्षण व शाश्वत रोजगाराची हमी द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दि. २० ऑक्टोबर २०२६ पर्यंत मागण्यांवर ठोस निर्णय न झाल्यास नागपूर येथील मुख्यमंत्री निवासस्थानासमोर लोकशाही व शांततामय मागार्ने आंदोलन करण्यात येईल, असा इशारा असोसिएशनचे राज्य कार्याध्यक्ष विक्की कावळे यांनी दिला आहे.

## एनटीपीसी मौदा को विद्युत अनुरक्षण में सर्वश्रेष्ठ समग्र प्रदर्शन पुरस्कार से सम्मानित





**दै. सिंहवाणी वृत्त, मौदा**

एनटीपीसी मौदा को विद्युत अनुरक्षण एवं परिचालन उत्कृष्टता के क्षेत्र में उल्लेखनीय उपलब्धियों के लिए वर्ष २०२५-२६ का 'सर्वश्रेष्ठ समग्र प्रदर्शन विद्युत अनुरक्षण विभाग पुरस्कार' प्रदान किया गया है। यह पुरस्कार ३० सितम्बर से १ अक्टूबर २०२६ तक रायपुर में आयोजित हेड ऑफ इलेक्ट्रिकल मेंटेनेंस वर्कशॉप २०२६-२७ के दौरान प्रदान किया गया। यह सम्मान एनटीपीसी के कॉर्पोरेट ऑपरेशन सर्विसेज इलेक्ट्रिकल समूह द्वारा दिया गया। एनटीपीसी मौदा की ओर से यह पुरस्कार अनिल कुमार, अपर महाप्रबंधक (विद्युत अनुरक्षण) ने प्राप्त किया।

यह सम्मान एनटीपीसी मौदा के विद्युत अनुरक्षण विभाग द्वारा उपकरणों की उच्च विश्वसनीयता सुनिश्चित करने, प्रभावी अनुरक्षण पद्धतियों को अपनाने, संयंत्र की उपलब्धता बढ़ाने तथा सुरक्षा मानकों का उत्कृष्ट रूप से पालन करने के लिए प्रदान किया गया है। यह उपलब्धि विभाग द्वारा पूरे वर्ष प्रदर्शित समर्पण, तकनीकी दक्षता एवं उत्कृष्ट टीमवर्क का प्रमाण है। एनटीपीसी मौदा प्रबंधन ने इस महत्वपूर्ण उपलब्धि पर विद्युत अनुरक्षण विभाग के सभी कर्मचारियों को बधाई देते हुए विश्वास व्यक्त किया कि टीम भविष्य में भी उत्कृष्ट प्रदर्शन के नए कीर्तिमान स्थापित करेगी तथा स्टेशन के सतत और श्रेष्ठ प्रदर्शन में महत्वपूर्ण योगदान देती रहेगी।

## जिल्ह्यात मनाई आदेश लागू

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

पोलिस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) आणि (३) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन जिल्ह्यात २५ ऑक्टोबरपर्यंत सार्वजनिक शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी अनुप खांडे यांनी मनाई आदेश लागू केला आहे. या कालावधीत जिल्ह्यातील ग्रामीण कार्यक्षेत्रात पाच किंवा अधिक व्यक्तींची सभा किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे.

## शेतकऱ्याची तलावात उडी घेऊन आत्महत्या

**चंद्रपूर :** पावसाअभावी धान पीक हातचे गेल्याने कर्जबाजारी झालेल्या नागभीड तालुक्यातील मींथुर येथील ६५ वर्षीय शेतकरी मुखरू लक्ष्मण दडमल यांनी रविवारी (११ ऑक्टोबर) गावातील तलावात उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. सकाळी सुमारे ८ वाजता ते तलावाकडे गेल्याचे सांगण्यात येते. त्यांच्या पत्नीने त्यांच्यावर मायक्रो फायनान्सचे कर्ज असल्याची माहिती दिली. यंदा पावसाअभावी संपूर्ण धान पीक उद्ध्वस्त झाल्याने कर्जाची परतफेड कशी करायची आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा, या विवंचनेत ते होते. शासनाने दुष्काळ जाहीर केला असला तरी मदत किती आणि कधी मिळणार, याबाबतही चिंता होती. घटनेची माहिती मिळताच नागभीड पोलिसांनी शोधमोहीम सुरू केली.

थोडक्यात

## चंद्रपाल चौकसे यांची रामटेक विधानसभा व राजकुमार राऊत यांची उमरेड विधानसभा समन्वयपदी नियुक्ती

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने विधानसभा मतदार संघ निहाय समन्वयकांची नियुक्ती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांचे प्रदेशाध्यक्ष





खासदार सुनील तटकरे यांनी दि.२ ऑक्टोबर २०२६ रोजी जाहीर केल्या आहेत त्यानुसार रामटेक विधानसभा मतदारसंघाच्या समन्वय पदी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष चंद्रपाल चौकसे व उमरेड विधानसभा मतदारसंघाच्या समन्वय पदी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी अध्यक्ष राजकुमार राऊत यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनर निरीक्षण हा निवडणूक प्रक्रियेच्या दृष्टीने महत्त्वाच्या उपक्रम असून मतदार यादीतील पात्र मतदारांची नावे कायम राहणे अपात्र अथवा नोंदीची पडताळणी होणे तसेच नागरिकांना मतदार यादीशी संबंधित आवश्यक माहिती व मार्गदर्शन मिळणे या दृष्टीने समन्वयकांची भूमिका महत्वाची ठरणार आहे.

रामटेक विधानसभा मतदार संघात या कार्यक्रमाला अनुषंकानी पक्षांमध्ये नवीन नेतृत्व तयार करणे युवकांना जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांकडून उमेदवारी देणे ग्रामपंचायत व बूथ स्तरावर युवकांना त्यांना पक्ष वाढीसाठी जबाबदारी देणे त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे विधानसभा क्षेत्रात स्थानिक पदाधिकारी व कार्यक्रमांमध्ये नवचैतन्य निर्मित करणे हे महत्त्वाचे कार्य चंद्रपाल चौकसे व राजकुमार राऊत यांना पार पाडायचे आहेत ही जबाबदारी ते प्रभावीपणे पार पाडतील असा विश्वास पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. या निवडीचे श्रेय खासदार प्रफुल पटेल व खासदार राजेंद्र जैन यांना दिले आहे.

## गायत्री परिवार ट्रस्टतर्फे २११ घटांची स्थापना



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

गायत्री परिवार ट्रस्ट, रामटेकतर्फे शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त ११ ते २० ऑक्टोबर २०२६ दरम्यान गायत्री धाम, कवडस, रामटेक येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त २११ घटांची स्थापना करण्यात आली आहे. कार्यक्रमांतर्गत दररोज सकाळ-संध्याकाळ सामूहिक गायत्री जप, आरती, हवन, दुर्गासप्तशती पाठ तसेच अन्य धार्मिक अनुष्ठाने पार पडणार आहेत. २० ऑक्टोबर रोजी विशेष पूजा-अर्चना, पूणार्हुती आणि प्रसाद वितरणाने कार्यक्रमाची सांगता होईल. देवी दुगेर्ची आराधना आणि गायत्री उपासनेच्या माध्यमातून श्रद्धाळूंच्या जीवनात सुख-शांती, समृद्धी तसेच आध्यात्मिक वातावरण निर्माण करणे हा आयोजनाचा उद्देश आहे. ट्रस्टने श्रद्धाळूंना धार्मिक कार्यक्रमांत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. ओंकार चौधरी, वंदना दिलीप रेवतकर, राऊत मेहरकुळे, नत्थु घरजाळे, शंकरराव चामलाटे, केशवराव चांपूरकर, गौरीशंकर सुनवाणी, दिलीप रेवतकर, हरिचंद राऊत, भोजराज महाजन, विनायक डांगरे, सुरेश कोरडे, गणपत भुरे, किरण कारेमोरे, दामोदर मोटघरे, रमाकांत कुंभलकर, राहुल विश्वकर्मा, चंद्रशेखर बडवाईक, प्रकाश चामलाटे, मनोज बोरकर, प्रकाश धोपटे, नंदुजी महाजन, श्रावण केवट, रमेश शेलवे, पारितोष चौकसे, विजय गड्डमवार, निर्मला सुनवाणी, मिना सुनवाणी, अमृता चामलाटे, कुंदा मेहरकुळे, सुनिता राऊत, नंदा मोटघरे, निशा कुंभलकर, शकुंतला चामलाटे, रेखा कोरडे, सुंदर खडसे, दुर्गा लोंढे, कविता महाजन, अंजना मुलकर आणि विद्या-अंजना प्रयत्नशील आहेत.

## कामठी पॉलीटेकनिक येथे मायनिंग विद्यार्थी परिषदेचे आयोजन




**दै. सिंहवाणी वृत्त, कामठी**

कामठी पॉलिटेक्निक कॉलेज येथे मायनिंग विद्यार्थी परिषदेचे आयोजन करण्यात आले होत. वेस्टर्न कोलफिल्ड इंडिया लिमिटेडचे जनरल मॅनेजर राजेशकुमारसिंग चौहान व रॉकटेक इंजिनीरिंग प्राईव्हेट लिमिटेड नागपूरचे डायरेक्टर डॉ. मनोज गुहार्रीकर यांचे हस्ते दीप प्रज्वलन व सरस्वतीच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून करण्यात आले. यावेळी प्राचार्य एस. घोळसे, विभाग प्रमुख प्रा. रवींद्र साधू, मायनिंग विभागातील प्रा. संजय देवळीकर, प्रा. एस श्रीखंडे, प्रा. स्नेहल घोगरे, आर. पांडे उपस्तिथ होते.

कार्यक्रमात प्रमुख अतिथी राकेशकुमारसिंग चव्हाण म्हणाले, स्पर्धेच्या युगात मायनिंगच्या क्षेत्रात विद्यार्थ्यांना रोजगाराच्या फार मोठ्या संधी उपलब्ध होत असतात तरी विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम करून रोजगारात नावीन्य प्राप्त करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. संजय देवडीकर यांनी केले. संचालन कलश व पारुड यांनी केले व आभार प्रदर्शन तीतीक्षा यांनी केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी भाटेरो, कापसे, हेटे, समृतवार, कनक, तुलसी, प्रांजल, रशिका, तितीक्षा,आफिनि परिश्रम घेतले.

# पिण्याच्या पाण्याचा गैरवापर करणाऱ्यांवर कठोर कारवाई

## संभाव्य पाणी टंचाईवर मात करण्यासाठी विविध उपाययोजना, महापौर निता ठाकरे यांनी घेतला आढावा, नागपूरकरांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा : महापौर

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या जलाशयांमध्ये पुरेसा जलसाठा उपलब्ध नसल्याने संभाव्य पाणी टंचाईचा सामना करण्यासाठी नागपूर महानगरपालिकेने विविध उपाययोजना करण्याचे प्रस्तावित केले आहे. पिण्याच्या पाण्याचा वापर वाहने धुणे किंवा बगिचासाठी वापर केल्याचे आढळून आल्यास त्यांच्यावर दंड ठोठावण्याचे प्रस्तावित आहे. महापौर श्रीमती निता ठाकरे यांनी नागपूर शहराच्या संभाव्या पाणी टंचाईच्या संदर्भात जलप्रदाय विभाग व ओसीडब्ल्यूच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन जलसाठ्याच्या सद्यस्थितीचा आढावा घेतला. यावेळी महापौर यांनी नागरिकांना संभाव्य पाणी टंचाईची परिस्थिती लक्षात घेता उपलब्ध



पाण्याचा गैरवापर टाळावा, पाणी जपून वापरावे असे आवाहन केले.

यावेळी उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी-वखरे, सत्ता पक्षनेता नरेंद्र (बाल्या) बोरकर, जलप्रदाय समितीच्या सभापती दिव्या धुरडे, आरोग्य समितीच्या सभापती मनीषा अतकरे, धरमपेठ झोनच्या सभापती धनश्री देशपांडे, अतिरिक्त आयुक्त मुरुगानंथम एम., अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम, अधीक्षक अभियंता डॉ. श्वेता बॅनर्जी, कार्यकारी अभियंता श्रीकांत वाईकर यांच्यासह ओसीडब्ल्यूचे अधिकारी उपस्थित होते.

यावर्षी कमी पाऊस झाल्यामुळे नागपूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या जलाशयांमध्ये केवळ ५८ टक्के साठा आहे. पाण्याची उपलब्धता विचारात घेऊन याद्वारे पुढील उपाययोजना प्रस्तावित करण्याचे निर्देश महापौर ठाकरे यांनी यावेळी अधिकाऱ्यांना दिले.

### बेकायदेशीर जोडण्यांवर कारवाई

सणासुदीचा काळ असला तरी बेकायदेशीर जोडण्यांद्वारे पाणी घेणाऱ्यांविरुद्ध कठोर मोहीम राबविण्यात येईल. अशा ग्राहकांना त्यांची जोडणी बेकायदेशीरवरून कायदेशीर करून घेण्याची संधी देण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयांमध्ये तात्काळ शिबिरे आयोजित करण्यात येतील. त्यानंतर बेकायदेशीर जोडणीच्या ठिकाणी मीटर बसवावेत आणि मीटरमध्ये छेडछाड झाल्याचे किंवा तो काढून टाकल्याचे आढळल्यास अशा दोषी ग्राहकांविरुद्ध पोलिसांमध्ये गुन्हे दाखल करण्यात येईल, असेही या बैठकीत ठरविण्यात आले.

### सार्वजनिक विहिरींची स्वच्छता

शहरातील सार्वजनिक विहिरींची स्वच्छता आणि सौर पंपांची स्थापना करून लघु पाणीपुरवठा योजनासुरू करण्याची सूचना यावेळी करण्यात आली. जलाशयांमधून होणारा पाण्याचा वापर कमी करण्यासाठी, सध्याच्या विहिरींची प्रयोगशाळेत पाण्याची गुणवत्ता तपासून स्वच्छ करून एमईडीएच्या मदतीने सौर पंप बसविणे आणि लघु पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करणे प्रस्तावित आहे. अशा योजनांमधून मिळणारे पाणी वाहनांची धुलाई, बागकाम इत्यादी पिण्याव्यतिरिक्त इतर कामांसाठी वापरता येईल.

### भूजल पुनर्भरण

भूजल सर्वेक्षण प्राधिकरणातर्फेच्या मार्गदर्शनाखाली कोरडया पडलेल्या सार्वजनिक विहिरींमध्ये बोअर करुन विहिरींचा वापर करणे, जास्तीत जास्त पुनर्भरण संरचना निर्माण करणे, बोअरवेलचे पुनरुज्जीवन करणे इत्यादी कामे करण्यात येतील.

### विकेंद्रित एसटीपी

योग्य ठिकाणी विकेंद्रित सांडपाणी प्रक्रिया केंद्र (एसटीपी) उभारण्याचे काम करण्यात येईल, जेणेकरून प्रक्रिया केलेले पाणी उद्याने, दुभाजकांमधील वृक्षारोपण, बांधकामाची कामे इत्यादींसाठी वापरता येईल.

### गैरवापर करणाऱ्यांवर दंड

पिण्याच्या पाण्याचा वापर कार धुण्यासाठी, रस्ते धुण्यासाठी, बागकामासाठी, बांधकामाच्या कामांसाठी करताना आढळल्यास प्रत्येक घटनेसाठी रु. ५ हजार रुपयांपर्यंत दंड आकारण्याचे यावेळी सुचविण्यात आले.

### गळतीची तात्काळ दुरुस्ती

शहरातील जलवाहिन्यांमधून होणारी गळती तत्काळ दुरुस्त करण्याचे यावेळी महापौरांनी अधिकाऱ्यांना दिले.

### पाण्याचा जपून वापर करा

नागरिकांना संभाव्य पाणी टंचाईची परिस्थिती लक्षात घेता उपलब्ध पाण्याचा गैरवापर टाळावा, पाणी जपून वापरावे असे आवाहन महापौर निता ठाकरे यांनी केले आहे.

# नागपूरच्या 'अखिलेश राहुल पाटील'चे UPSC NDA परीक्षेत दैदिप्यमान यश!

## "अखिलेशचे यश हे संस्थेतील इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी" : संचालक मनीष पाटील

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र सैनिक प्रबोधिनीचा गुणवंत विद्यार्थी 'अखिलेश राहुल पाटील' याने UPSC NDA परीक्षेत यश संपादन केल्याबद्दल संस्थेचे संचालक मनीष पाटील यांनी त्याचे तोंडभरून कौतुक केले आणि पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी संस्थेच्या वतीने मनीष पाटील यांच्या हस्ते अखिलेशचा शाल व पुषुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. हा कौतुक व सत्कार सोहळा नुकताच महाराष्ट्र सैनिक प्रबोधिनी, झाल्टा फाटा, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर येथील सांस्कृतिक सभागृहात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. आयोजित कौतुक व सत्कार सोहळ्याप्रसंगी संचालक मनीष पाटील यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना अखिलेशच्या यशाचे विशेष कौतुक केले.

तसेच NDA परीक्षेची तयारी कशा पद्धतीने करावी, अभ्यासाचे नियोजन कसे करावे, वेळेचे व्यवस्थापन, नियमित सराव,



शारीरिक तंदुरुस्ती, स्वयंशिस्त आणि सातत्यपूर्ण मेहनत यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. ते पुढे म्हणाले, 'यश मिळवण्यासाठी केवळ स्वप्ने पाहून चालत नाही, तर त्या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमांची जोड आवश्यक असते,' असा मोलाचा संदेश देत त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित केले.

महाराष्ट्र सैनिक प्रबोधिनीच्या अखिलेशचे यश हे संस्थेतील इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असून, त्याच्या यशातून प्रत्येक विद्यार्थ्यांने प्रेरणा घेऊन आपल्या ध्येयाच्या दिशेने आत्मविश्वासाने वाटचाल करावी, असे आवाहनही त्यांनी याप्रसंगी केले. अखिलेश पाटील याचे अभिनंदन करत त्याच्या भावी वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

मराठीचे शिलेदार बहुउद्देशीय संस्था, नागपूरचे संस्थापक, अध्यक्ष, साप्ताहिक साहित्यगंध व बिनधास्त न्यूज पोर्टलचे मुख्य संपादक व मराठीचे शिलेदार प्रकाशन संस्थेचे प्रकाशक 'राहुल पाटील' व संस्थेच्या सचिव 'पल्लवी पाटील' यांचा अखिलेश पाटील हा चिरंजीव आहे. अखिलेशने गतसालीही एनडीए पूर्वपरीक्षेत उत्तीर्ण होत भरारी घेतली होती. कमी वयात उत्तीर्ण होणारा तो एकमेव विद्यार्थी होता. भारतीय सेनेत दाखल होऊन देशसेवा करण्याची स्वप्ने पूर्णत्वास आणण्यासाठी जिद्द, चिकाटी व कठोर परीश्रम करण्यासाठी लागणारा आत्मविश्वास अत्यंत महत्वाचा असल्याचे अखिलेशचे पालक सांगतात.

अखिलेशने पहिल्याच प्रयत्नात दोनदा यश संपादन केल्याने सूर्यकांत जोग दीपशिखा गुरूकुल सैनिक स्कूल, चिखलदरा जि.अमरावती येथील कमाडंट संग्राम दळवी, समीर, वैद्य यांनीही कौतुक करत शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्र सैनिक प्रबोधीनीतर्फे सर्व प्राध्यापक वर्ग, कर्मचारी वृंद मनोज पाटील, शिंदे सर यांनीही शुभेच्छा दिल्यात.

अखिलेशच्या यशाचा अभिमान असल्याचे बहिण कु.हर्षिता पाटील हिनेही कौतुक केले. सोबतच अखिलेशचे मामा झेनिथ जवादे, मामी विजेता जवादे, आजी श्रीमती कुसुम जवादे, चि.आदित्य जवादे यांच्यासह डॉ.निलिमा डोंगरे, प्रा.मनोज डोंगरे, श्रेयस डोंगरे, मुंबई, अशोक पाटील, चंद्रपूर, जोतिराव बारसागडे, प्रशांत सोमकुवर,डॉ. अविनाश परांजपे, नवनाथ बन्सोड, डॉ.नरहरशेट्टीवार, शालिनी शंभरकर आदी आप्तेष्टांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्यात. अखिलेशच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत असून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# मॅग्नेट प्रकल्पाच्या विविध योजनांचा लाभ घ्या!

## शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था व कृषी संस्थांना ६० टक्क्यांपर्यंत अनुदान

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, शेतमालाचे मूल्यवर्धन करणे, काढणीपश्चात होणारे नुकसान कमी करणे तसेच ग्रामीण भागातील महिलांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करून त्यांचे आर्थिक सक्षमीकरण करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पांतर्गत विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र संस्थांनी प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन प्रकल्प उपसंचालक राजेश सरोदे यांनी केले आहे.

मॅग्नेट प्रकल्पांतर्गत सीताफळ, पेरू, केळी, स्ट्रॉबेरी, संत्रा, डाळिंब, चिकू, मोसंबी, हिरवी व लाल मिरची, भेंडी, आंबा, काजू, लिंबू, पडवळ आणि फुलपिके या पिकांचा समावेश करण्यात आला आहे. या पिकांच्या मूल्यसाखळ्या विकसित करून शेतकऱ्यांना बाजारपेठेशी जोडणे, उत्पादनाची गुणवत्ता सुधारणे आणि कृषी व्यवसायाला चालना देणे हा या प्रकल्पाचा उद्देश आहे.

### ६० टक्क्यांपर्यंत अनुदानाची सुविधा

प्रकल्पातील घटक क्रमांक एक अंतर्गत बाजाराभिमुख उत्पादन वाढविणे आणि उत्पादकता सुधारणे या उपघटकांतर्गत विविध बाबींसाठी खर्चाच्या ६० टक्क्यांपर्यंत अनुदान देण्यात येते. यामध्ये ग्लोबल गॅप प्रमाणपत्र, कीटकनाशक अवशेषांची कमाल मयार्दा तपासणी (एमआरएल टेस्टिंग), केळी पिकासाठी फूट केअर प्रॅक्टिसेस आणि सेंद्रिय प्रमाणीकरण यांचा समावेश आहे.

### विदर्भातील सहा जिल्ह्यांतील संस्थांना संधी

नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतकरी सहकारी संस्था, कृषी विज्ञान केंद्रे आणि कृषी विद्यापीठांनी या योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन मॅग्नेट प्रकल्पाच्या नागपूर येथील प्रकल्प अंमलबजावणी कक्षाचे प्रकल्प उपसंचालक राजेश सरोदे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, पहिला मजला, न्यू कॉटन मार्केट यार्ड, बसस्थानकासमोर, शेतकरी निवासाच्या मागे, गणेशपेठ, नागपूर येथे राजेश सरोदे, प्रकल्प उपसंचालक व रुपेश माने यांच्याशी संपर्क करावा.

# जलालखेड्याच्या आकाश दंढारेंची वैद्यकीय क्षेत्रात भरारी! पीएच.डी.पर्यंत मजल मारत मिळविले मानाचे यश

## डेंग्यू विषाणूच्या वाहकावरील संशोधनाची दखल, नागपूर जिल्ह्यातील डेंग्यू नियंत्रणासाठी संशोधन ठरणार महत्त्वपूर्ण

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड तालुक्यातील जलालखेडा येथील डॉ. आकाश परसराम दंढारे यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या बळावर वैद्यकीय संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. रांची येथील रामकृष्ण धार्मिक फाउंडेशन विद्यापीठाने त्यांना वैद्यकीय मायक्रोबायोलॉजी विषयात पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे. त्यांच्या या यशामुळे जलालखेडा परिसरासह नरखेड तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

शेतकरी कुटुंबातील प्रतिकूल परिस्थितीवर मात करत डॉ. आकाश दंढारे यांनी शिक्षणाची वाटचाल सुरू ठेवली. परिस्थिती कितीही कठीण असली, तरी ध्येय निश्चित असेल आणि त्यासाठी सातत्याने प्रयत्न केले, तर यश मिळविता येते, हे त्यांनी आपल्या कर्तृत्वातून सिद्ध केले आहे. वैद्यकीय क्षेत्रात उच्च शिक्षण घेण्याबरोबरच संशोधनाच्या माध्यमातून समाजासाठी योगदान देण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे.

डॉ. आकाश दंढारे यांच्या संशोधनाचा विषय नागपूर जिल्ह्यातील डेंग्यू विषाणूचा वाहक असलेल्या एडिस



इजिप्ती या डासाच्या वर्गीकरणविषयक आणि आण्विक वैशिष्ट्यीकरणाशी संबंधित होता. डेंग्यूचा प्रसार रोखण्यासाठी त्याच्या वाहक डासांचा अभ्यास करणे महत्त्वाचे मानले जाते. या संशोधनातून डासांच्या प्रजातींची ओळख, त्यांच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास आणि डेंग्यू नियंत्रणाच्या दृष्टीने उपयुक्त माहिती मिळण्यास मदत होऊ शकते.

नागपूर जिल्ह्यात डेंग्यूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी अशा प्रकारचे संशोधन महत्त्वपूर्ण ठरू शकते. डेंग्यूच्या प्रसारामागील कारणांचा अभ्यास करून प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक प्रभावी करण्यासाठी संशोधन क्षेत्रातील योगदान मोलाचे ठरते. त्यामुळे डॉ. दंढारे यांच्या संशोधनाकडे वैद्यकीय क्षेत्राच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण कामगिरी म्हणून पाहिले जात आहे.

या संशोधनासाठी त्यांना डॉ. अमित कुमार पांडे, डॉ. प्रभाकर भंडारी, डॉ. यशेश ठाकूर, डॉ. नवीन हिरकूर आणि डॉ. शेखर राऊत यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच कुटुंबीय आणि मित्रमंडळींचे सहकार्य मिळाल्याचे डॉ. दंढारे यांनी सांगितले.

### ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी यश

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसमोर अनेक शैक्षणिक आणि आर्थिक अडचणी असतात. मात्र, या अडचणींवर मात करून उच्च शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात यश मिळविता येते, याचे उदाहरण डॉ. आकाश दंढारे यांनी घालून दिले आहे. त्यांच्या या यशामुळे जलालखेडा गावासह नरखेड तालुक्यातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण, वैद्यकीय संशोधन आणि वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासण्यासाठी प्रेरणा मिळणार आहे.

डेंग्यू नियंत्रणासारख्या सार्वजनिक आरोग्याशी निगडित विषयावर संशोधन करून त्यांनी वैद्यकीय क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या या यशाबद्दल परिसरातून अभिनंदन होत असून, त्यांच्या पुढील संशोधन कायासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

थोडक्यात

## मिशन लक्षवेधअंतर्गत १५ व १९ ऑक्टोबरला क्रीडा निवड चाचणी

### टेबल टेनिस, शूटिंग, कुस्ती व ॲथलेटिक्समधील गुणवंत खेळाडूंना संधी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राज्य शासनाच्या 'मिशन लक्षवेध' योजनेंतर्गत जिल्हास्तरीय क्रीडा प्रतिभा विकास केंद्रासाठी ॲथलेटिक्स, टेबल टेनिस, कुस्ती व शूटिंग या चार क्रीडा प्रकारांची चतुर्थ निवड चाचणी १५ व १९ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आली आहे. जिल्ह्यातील गुणवंत व प्रतिभावान खेळाडूंना क्रीडा क्षेत्रात प्रगती करण्याची संधी मिळावी, या उद्देशाने ही निवड चाचणी घेण्यात येणार आहे. दिनांक १५ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता टेबल टेनिस व शूटिंग या क्रीडा प्रकारांची निवड चाचणी विभागीय क्रीडा संकुल, मानकापूर, नागपूर येथे होणार आहे. तर १९ ऑक्टोबर रोजी कुस्ती व मैदानी (ॲथलेटिक्स) या क्रीडा प्रकारांची निवड चाचणी आयोजित करण्यात येणार आहे.

निवड चाचणीसाठी इच्छुक खेळाडूंनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी केले आहे. यापूर्वी एप्रिल तसेच मे रोजी झालेल्या निवड चाचणीत सहभागी झालेल्या खेळाडूंना या चाचणीत पुन्हा सहभागी होता येणार नाही. तसेच, कागदपत्रांच्या पडताळणीत अपात्र ठरणाऱ्या खेळाडूंना निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

या निवड चाचणीतून निवड झालेल्या खेळाडूंना मिशन लक्षवेध योजनेंतर्गत तज्ज्ञ प्रशिक्षकांमार्फत विशेष मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यात येणार आहे. याशिवाय खेळाडूंना क्रीडा वैद्यकीय सुविधा, क्रीडा गणवेश, पोषण आहार, स्पोर्ट्स सायन्स सेंटरच्या सुविधा तसेच आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील उद्योन्मुख खेळाडूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकण्याची संधी मिळणार आहे. निवड चाचणीबाबत अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे कळविण्यात आले आहे.

## मोहम्मद रफी यांच्या सदाबहार गीतांनी सजली सुरेल संध्याकाळ

### 'मोहम्मद रफी-१' संगीत कार्यक्रमात गायकांच्या सादरीकरणांनी रसिक मंत्रमुग्ध



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महान पार्श्वगायक मोहम्मद रफी यांच्या सदाबहार गीतांची सुरेल मेजवानी संगीतप्रेमींना देण्याच्या उद्देशाने रविवारी सायंकाळी लक्ष्मीनगर येथील सायंटिफिक हॉलमध्ये 'मोहम्मद रफी-१' या विशेष संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मोहम्मद रफी यांच्या सदाबहार गीतांचा आस्वाद घेण्यासाठी रसिकांनी सायंटिफिक हॉलमध्ये मोठी गर्दी केली होती. सभागृह खचाखच भरलेले असतानाही अनेक रसिकांनी उभे राहून कार्यक्रमाचा आनंद घेतला. कार्यक्रमाची सुरुवात डिस्ट्रिक्ट बार असोसिएशन, नागपूरचे अध्यक्ष प्रकाश जयस्वाल, लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद असलेले मोहन अय्यर, मधुकर पराते, फाल्गुन गजभिये, स्वरधना फाउंडेशनच्या संचालिका कल्पना मिश्रा आणि कार्यक्रमाच्या आयोजक रंजना गंडोले यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली.

कार्यक्रमात गायक आणि यूट्यूबर हेमंत गंडोले यांच्यासह स्वस्तिका ठाकूर आणि आकांक्षा नगरकर यांनी मोहम्मद रफी यांच्या लोकप्रिय व सदाबहार गीतांचे बहारदार सादरीकरण केले. वादियाँ मेरा दामन, तुम बिन जाऊँ कहाँ, दिल बेकरार सा है, खुदा भी आसमाँ से जब जमीं पर देखता होगा, अजी रूठकर अब कहाँ जाइएगा, सुनो सजना, छू लेने दो नाजुक होंठों को आणि पत्ता-पत्ता बूटा-बूटा यांसारख्या अनेक सुमधुर गीतांनी रसिकांना जुन्या हिंदी चित्रपटसृष्टीच्या सुवर्णकाळातील आठवणींत रमवले.

की-बोर्डवर पवन मानवटकर, व्हायोलिनवर अमर शेंद्रे, गिटारवर मनोज विश्वकर्मा, सॅक्सोफोनवर स्वप्नील दुबे, बासरीवर शिवलाल यादव, ढोलकवर अशोक टोकलवार, ऑक्टोपॅडवर अक्षय हरले, तुम्बाकोंगोवर राजेश धामणकर, ड्रमवर सुभाष वानखेडे आणि तबल्यावर प्रशांत नागमोते यांनी आपल्या वादनाने गीतांना सुरेल साज चढवला. शेवटच्या गीतापर्यंत रसिकांनी दिलेली उत्स्फूर्त साथ आणि टाळ्यांच्या गजराने संपूर्ण कार्यक्रमाला विशेष रंगत आणली. यावेळी सूत्रसंचालन करणाऱ्या श्वेता शेलगावकर, राजेश समर्थ, स्वस्तिका ठाकूर, आकांक्षा नगरकर यांचा मदन खंडार यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच स्वराधना फाउंडेशनतर्फे उदय कुर्झाडकर यांच्या हस्ते गायक हेमंत गंडोले यांना स्मृतिचिन्ह प्रदान करून गौरविण्यात आले. माँ वैष्णवी ग्रुपचे मधुकर पराते यांचे कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मोलाचे सहकार्य लाभले.

## शेतकरी कर्जमुक्तीची तिसरी यादी जाहीर

**मुंबई :** राज्यातील थकबाकीदार शेतकरी बांधवांसाठी एक अत्यंत दिलासादायक आणि महत्त्वाची बातमी समोर आली आहे. 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' अंतर्गत पात्र लाभार्थी शेतकऱ्यांची तिसरी यादी १२ ऑक्टोबर २०२६ रोजी अधिकृतपणे जाहीर करण्यात आली आहे. या तिसऱ्या यादीमध्ये राज्यातील ३ लाख ५१ हजार १९२ शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. या सर्व पात्र शेतकऱ्यांनी आपल्या कर्जखात्याची थकबाकी तपासून तातडीने नजीकच्या 'आपले सेवा केंद्रावर' जाऊन आधार प्रमाणीकरण पूर्ण करून घ्यावे आणि कर्जमुक्तीचा लाभ घ्यावा, असे आवाहन राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले आहे.'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' च्या निकषांनुसार राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा देण्यात येत आहे. कालावधीचा निकषः १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत वितरित झालेली, ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली पीककर्जे यात समाविष्ट आहेत.

# धापेवाड्यात हातमागाच्या वैभवाला आधुनिकतेची नवी वीण

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरींच्या संकल्पनेतून धापेवाडा टेक्स्टाईलचा नवा अध्याय, अभिनेत्री हेमामालिनीच्या हस्ते उद्घाटन, धापेवाड्यातील हातमाग साड्यांचा फॅशन शो!

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

परंपरेच्या धाग्यांना आधुनिकतेची वीण देत विदर्भातील हातमाग उद्योगाला नवी ओळख, नवी बाजारपेठ आणि नव्या पिढीच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या महत्त्वाकांक्षी पवार्चा शुभारंभ शनिवार, १७ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी २ वाजता धापेवाडा (कळमेश्वर), नागपूर येथे होणार आहे. यासंदर्भात आज पत्रकार परिषदेत माहिती देण्यात आली. धापेवाडा टेक्सटाईल उद्योग प्रोड्यूसर कंपनी लिमिटेडच्या नूतन इमारतीचे लोकार्पण तसेच हातमाग उद्योगाचा शुभारंभ केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक व राष्ट्रीय महामार्ग मंत्री तथा या प्रकल्पाचे मार्गदर्शक ना. श्री. नितीनजी गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून, सुप्रसिद्ध अभिनेत्री व खासदार श्रीमती हेमामालिनी यांच्या शुभहस्ते हा महत्त्वपूर्ण सोहळा पार पडणार आहे.

या कार्यक्रमाला केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराजसिंह, महाराष्ट्राचे महसूल मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे तसेच महाराष्ट्राचे वस्त्रोद्योग मंत्री श्री. संजय सावकारे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

**परंपरेला आधुनिक बाजारपेठेची जोड**

नागपूर जिल्ह्यातील धापेवाडा-कळमेश्वर परिसराला पारंपरिक विणकामाची समृद्ध परंपरा लाभली आहे. पिढ्यान्‌पिढ्या येथील विणकरांनी आपल्या कौशल्यातून केवळ वस्त्रांची निर्मिती केली नाही, तर या मातीची संस्कृती, परंपरा, कलात्मकता आणि अस्मिता जपली आहे. मात्र, बदलत्या काळात पारंपरिक हातमागाला आधुनिक डिझाईन, ब्रँडिंग, बाजारपेठ आणि ग्राहकांशी थेट जोडण्याची गरज निर्माण झाली आहे. ही गरज ओळखून स्थानिक विणकरांच्या कलेला देश-विदेशातील बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचा संवेदनशील विचार ना. नितीनजी गडकरी यांच्या मनात आला.

स्थानिक विणकरांच्या हातातील कौशल्याला नवी दिशा मिळावी, ही वैभवशाली परंपरा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचावी आणि विदर्भातील हातमागाला जागतिक व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने गडकरी यांनी या संकल्पनेला सातत्याने प्रोत्साहन दिले. त्यांच्या मार्गदर्शनातून आणि प्रयत्नांतून धापेवाडा टेक्सटाईल उद्योग प्रोड्यूसर कंपनी लिमिटेडच्या माध्यमातून हे स्वप्न आता प्रत्यक्षात साकार होत आहे.

**मुंबईतील मॉडेल्स सादर करणार धापेवाड्याच्या साड्या**

या उद्घाटन सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे मुंबईतील सुप्रसिद्ध मॉडेल्स धापेवाडा टेक्सटाईलच्या साड्या परिधान करून विशेष फॅशन शो सादर करणार आहेत. पारंपरिक



हातमागाच्या साड्यांना आधुनिक फॅशनच्या व्यासपीठावर सादर करून त्यांची गुणवत्ता, सौंदर्य आणि वैशिष्ट्य देशभर पोहोचविण्याचा हा अभिनव प्रयत्न आहे.

या फॅशन शोमध्ये कॅडीएन्स अकादमी देखील सहभागी होणार असून, पारंपरिक हातमाग आणि आधुनिक फॅशन यांचा अनोखा मिलाफ या माध्यमातून पाहायला मिळणार आहे. हातमागाची साडी ही केवळ पारंपरिक वस्त्र नसून ती कला, कौशल्य, संस्कृती आणि आत्मनिर्भरतेचे प्रतिक आहे, हा संदेश या फॅशन शोच्या माध्यमातून व्यापक स्तरावर पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

**महिलांच्या हाताला कौशल्य, आत्मनिर्भरतेला बळ**

धापेवाडा टेक्सटाईलचा हा प्रकल्प केवळ उत्पादन किंवा व्यवसायापुरता मर्यादित नसून त्यामागे महिला सक्षमीकरण आणि रोजगारनिर्मितीचा महत्त्वपूर्ण सामाजिक विचार आहे.

स्थानिक तसेच विदर्भातील विणकर महिलांचे कौशल्य अधिक समृद्ध व्हावे, त्यांना आधुनिक तंत्रज्ञान व डिझाईनचे ज्ञान मिळावे आणि त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम व आत्मनिर्भर व्हाव्यात, यासाठी महिलांना हातमागाचे प्रशिक्षण देण्याचे कार्यही या उपक्रमांतर्गत सुरू करण्यात आले आहे.

परंपरागत कौशल्याला आधुनिक प्रशिक्षणाची जोड मिळाल्यास ग्रामीण आणि स्थानिक महिलांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होऊ शकतात. त्याचबरोबर त्यांच्या कुटुंबाच्या आर्थिक स्थैर्याला आणि स्थानिक अर्थव्यवस्थेलाही मोठी चालना मिळू शकते.

**'धागा परंपरेचा, वीण समृद्धीची'**

धापेवाडा टेक्सटाईलच्या माध्यमातून विदर्भातील हातमागाला केवळ बाजारपेठ मिळवून देण्याचा प्रयत्न नसून, विणकरांच्या कष्टाला प्रतिष्ठा, त्यांच्या कलेला योग्य मूल्य आणि त्यांच्या पुढील पिढीला उज्ज्वल भविष्य देण्याचा प्रयत्न आहे. हातमागाच्या प्रत्येक धाग्यामागे एका कारागिराचे कौशल्य, एका कुटुंबाची मेहनत आणि शेकडो वर्षांची सांस्कृतिक परंपरा दडलेली आहे. त्यामुळे या कलेला आधुनिक बाजारपेठेशी जोडणे म्हणजे आपल्या सांस्कृतिक वारशाला नवजीवन देणे होय.

'परंपरेच्या धाग्यांना आधुनिकतेची वीण आणि स्थानिक कौशल्याला जागतिक बाजारपेठ' या संकल्पनेतून धापेवाडा टेक्सटाईलचा हा नवा प्रवास सुरू होत आहे.

**पाचगाव हातमाग प्रकल्प**

नागपूरची ओळख जशी झिरो माइल सिटी, टायगर कॅपिटल आणि संत्रानगरी म्हणून आहे, तशीच नागपूर आणि विदर्भाची एकेकाळी हातमाग वस्त्रोद्योगासाठीही विशेष ओळख होती. या परंपरेचे वैभव पुन्हा प्राप्त करून देण्याचे स्वप्न उराशी बाळगून केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी यांच्या पुढाकारातून नागपूर जिल्ह्यातील पाचगाव येथे हातमाग वस्त्रोद्योगाचा अभिनव प्रयोग सुरू करण्यात आला.

ग्रामीण महिलांच्या हाताला काम, टाकाऊ कापडाला नवे मूल्य आणि स्थानिक कुटुंबांना उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देणे, ही या प्रकल्पामागील प्रमुख संकल्पना आहे. पारंपरिक विणकामाच्या कौशल्याला आधुनिक प्रशिक्षणाची जोड देत ग्रामीण भागात रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला.

या प्रकल्पातून तीन महत्त्वाच्या उद्दिष्टांवर भर देण्यात आला आहे.

**१. ग्रामीण रोजगारनिर्मिती :** गावातच रोजगार आणि उत्पन्नाचे साधन उपलब्ध झाल्यास महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्याची संधी मिळू शकते. त्याचबरोबर ग्रामीण कुटुंबांच्या उत्पन्नवाढीलाही हातभार लागू शकतो.

**२. कौशल्य विकास आणि परंपरेचे जतन :** पारंपरिक विणकामाच्या कौशल्याला प्रशिक्षण आणि नव्या तंत्रांची जोड दिल्यास वैविध्यपूर्ण वस्त्रांची व उपयुक्त उत्पादनांची निर्मिती करता येते. यातून हातमाग परंपरेचे जतन आणि संवर्धनही शक्य होते.

**३. स्थानिक उत्पादनांना बाजारपेठ :** टाकाऊ कापडाचा पुनर्वापर, योग्य कच्च्या मालाची उपलब्धता, उत्पादनांची गुणवत्ता आणि प्रभावी विक्रीव्यवस्था यांची सांगड घातल्यास ग्रामीण उद्योगांना नवी दिशा मिळू शकते. स्थानिक उत्पादनांना व्यापक बाजारपेठ मिळाल्यास या उद्योगाच्या विस्ताराच्या संधीही वाढू शकतात.

या पत्रकार परिषदेला धापेवाडा टेक्सटाईल उद्योग प्रोड्यूसर कंपनीचे संचालक सुधीर दिवे, राजश्री बापट, दिलीप धोटे, किरण खडगी, दिलीप डाखोळे, प्रभू महाराज पराते, गोविंदराव झोडे, गंगाधरराव नागपुरे, मिलिंद वेळेकर, ज्योती मानकर, सोनाली अंबोलीकर, सीमा साबळे, रुचिता पराते, रुपेश कुमार, नितीन कुलकर्णी यांची उपस्थिती होते.

## 'युनिटी रन'मधून नागपूरकर देणार राष्ट्रीय एकतेचा संदेश

### येत्या ३१ ऑक्टोबर रोजी भव्य आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

देशाचे पहिले गृहमंत्री, उपपंतप्रधान, लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्त नागपूर महानगरपालिकेच्या वतीने युनिटी रन मॅरेथॉन स्पधेर्चे आयोजन शनिवार ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजता सरदार वल्लभभाई पटेल कच्छीविसा मैदान, वर्धमान नगर येथून करण्यात आले आहे. शहरातील नागरिकांच्या या स्पर्धेतील सहभागातून एकतेचा संदेश देण्याचा यामागील उद्देश असून, मोठ्या संख्येत नागरिकांनी स्पर्धेत सहभाग नोंदवावा असे आवाहन मनपाच्या क्रीडा विभागाद्वारे करण्यात आले आहे.

शहरातील नागरिकांमध्ये राष्ट्रीय एकात्मता, बंधुभाव आणि सामाजिक ऐक्याची भावना दृढ करण्याच्या उद्देशाने मनपाद्वारे युनिटी रन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यास्पर्धेत १० कि.मी. पुरुष खुला गट, ५ कि.मी. महिला खुला गट, ५ कि.मी. मुले -१६ वर्षांखालील मुले, ३ कि.मी. मुली-१६ वर्षांखालील मुले तसेच इतर सर्वांसाठी २.५ कि.मी. युनिटी रन यांचा समावेश आहे. स्पर्धेतील सहभागी धावपटूंना प्रोत्साहन देण्यासाठी आकर्षक पारितोषिके प्रदान केली जाणार आहे. यात एकूण ३ लाख रुपयांची रोख पारितोषिके देण्यात येणार असून, वेशभूषा स्पर्धा (फॅन्सी ड्रेस) सहभागींसाठी आकर्षक बक्षिसे, प्रथम ५ हजार धावपटूंना पदके आणि सर्व नोंदणीकृत धावपटूंना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी मनपाद्वारे https://unity-run.emergent.host/ संकेतस्थळ व क्यूआर कोडवर उपलब्ध करून दिला आहे, इच्छुकांनी आपली येत्या २९ ऑक्टोबर पर्यंत नोंदणी करावी, नोंदणीकृत स्पर्धकांना ३० ऑक्टोबर रोजी टी-शर्ट्स आणि चेस्ट क्रमांक प्रदान केला जाणार आहे. राष्ट्रीय एकता आणि सामाजिक सलोखा अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात नागपूरकरांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून युनिटी रनला यशस्वी करावे असे आवाहन मनपाद्वारे करण्यात आले आहे.

## पुढील तीन वर्षे काँक्रिटचे रस्ते करणार नाही!

**जळगाव :** पुढील तीन वर्षे काँक्रिट रस्त्याचे काम न करता तो निधी शाळांच्या विकासासाठी खर्च केला जाणार असल्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असल्याची माहिती मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली. ते जळगावमध्ये बोलत होते. राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी आज दुष्काळ आढावा बैठक आयोजित केली होती. या वेळी त्यांनी राज्य सरकारने एक मोठा निर्णय जाहीर केल्याची माहिती दिली. यावर्षी जिल्ह्यात सिमेंट काँक्रीटचे रस्ते न बनवता, तो सर्व निधी शाळा आणि अंगणवाड्यांच्या विकासासाठी वळवण्यात येणार असल्याची घोषणा त्यांनी केली आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या एका महत्त्वाच्या आढावा बैठकीनंतर ते पत्रकारांशी बोलत होते. राज्य मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार यावर्षी रस्त्यांची कामे न घेता, शाळांच्या विकासावर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. जळगाव जिल्हा परिषद आणि जिल्हाधिकारी यांनी सर्व आमदारांच्या संमतीने एक आराखडा तयार केला आहे. आगामी ३ वर्षांत जिल्ह्यातील शाळा आणि अंगणवाड्यांना 'मॉडेल स्कूल' बनवले जाईल. यासाठी तब्बल ९९ कोटी रुपयांचा जनसुविधेचा निधी वापरला जाणार आहे. ज्यामध्ये नवीन इमारती बांधणे, जुन्या शाळांची दुरुस्ती, पिण्याचे पाणी आणि स्वच्छतागृहांची व्यवस्था करणे यावर भर दिला जाईल.

## जागतिक अंडी दिनानिमित्त जिल्हा परिषद शाळांमध्ये ५७०० अंड्यांचे वाटप

### मुलांच्या पोषणासाठी दररोज एक अंडे देण्याचे आवाहन, अंड्यांच्या पौष्टिकतेबाबत जनजागृती

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

जागतिक अंडी दिनानिमित्त जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळा आणि अंगणवाड्यांमध्ये पशुसंवर्धन विभागाच्या वतीने ५ हजार ७०० अंड्यांचे वाटप करण्यात आले. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांना अंड्यांचे आहारातील महत्त्व पटवून देणे आणि संतुलित आहाराबाबत जनजागृती करणे, हा या उपक्रमाचा उद्देश होता.

ऑक्टोबर महिन्यातील दुसरा शुक्रवार जागतिक अंडी दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त पशुसंवर्धन विभागाच्या विविध संस्थाप्रमुखांनी जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळा आणि अंगणवाड्यांमध्ये अंडी वाटप करून अंड्यांच्या



पोषणमूल्यांबाबत जनजागृती केली.

आरोग्य विभागाच्या बैठकीदरम्यान पशुसंवर्धन विभागाच्या वतीने नाश्त्यासाठी अंडी व केळी यांचे वाटप करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी अंडी हा पौष्टिक आहाराचा महत्त्वाचा स्रोत असल्याचे सांगितले. रुग्णांना अंड्यांच्या पोषणमूल्यांची माहिती देण्यासोबतच आरोग्य विभागानेही अंड्यांच्या आहारातील महत्त्वाबाबत व्यापक जनजागृती करावी, असे आवाहन त्यांनी केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनीही मुलांच्या पोषणासाठी अंड्यांचा आहारात समावेश करण्याचे आवाहन केले. नाश्त्यामध्ये तळलेले व कमी पौष्टिक पदार्थ खाण्याऐवजी अंड्यांसारख्या पौष्टिक पदार्थांना प्राधान्य द्यावे. तसेच मुलांना मैद्यापासून तयार केलेली महागडी बिस्किटे, पेस्ट्री आणि चिप्स देण्याऐवजी त्यांच्या आहारात दररोज एका अंड्याचा समावेश करावा, असे त्यांनी सांगितले.



**अंडे म्हणजे पोषणाचा खजिना**

अंडे हे सहज उपलब्ध होणारे आणि तुलनेने किफायतशीर प्रथिनांचा स्रोत आहे. एका अंड्यात साधारणतः ६ ते ७ ग्रॅम उच्च दर्जाचे प्रथिने असतात. शरीराच्या वाढीसाठी आवश्यक असलेल्या अमिनो आम्लांचा पुरवठा अंड्यातून होतो. त्यामुळे मुलांची शारीरिक वाढ, स्नायूंचा विकास आणि शरीराची दैनंदिन पोषणाची गरज पूर्ण करण्यासाठी अंडे उपयुक्त ठरते. अंड्यातील पिवळ्या बलकात असलेले कोलीन हे पोषकद्रव्य मेंदूच्या विकासासाठी आणि स्मरणशक्तीसाठी महत्त्वाचे आहे. तसेच अंड्यात ल्यूटीन व झीॲक्सॅन्थिन यांसारखे घटक असून ते डोळ्यांच्या आरोग्यासाठी उपयुक्त आहेत. अंड्यातील जीवनसत्त्वे आणि खनिजे शरीराची विविध कार्ये सुरळीत ठेवण्यास मदत करतात. विशेषतः मुलांच्या वाढीच्या वयात संतुलित आहारासोबत अंड्यांचा समावेश फायदेशीर ठरू शकतो. गर्भवती महिला, वाढत्या वयातील मुले आणि ज्येष्ठ नागरिक यांच्या आहारातही अंड्यांचा योग्य प्रमाणात समावेश करता येतो. अंड्यातील प्रथिने व इतर पोषक घटक शरीराची झीज भरून काढण्यास आणि स्नायूंचे आरोग्य टिकविण्यास मदत करतात.

**मुलांच्या डब्यात अंड्याचा समावेश करा**

शाळेत जाणाऱ्या मुलांना दररोजच्या आहारातून पुरेसे पोषण मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे पालकांनी मुलांच्या डब्यात अंड्याचा समावेश करावा. अंडे पूर्णपणे शिजवून किंवा उकडून खाणे अधिक सुरक्षित असून, कच्चे अथवा अर्धवट शिजवलेले अंडे खाणे टाळावे, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाच्या वतीने करण्यात आले.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतले कोराडीच्या श्री महालक्ष्मी जगदंबेचे दर्शन

**दुष्काळाच्या संकटाचा सामना करण्यासाठी शासन सज्ज, शेतकऱ्यांना संकटाशी लढण्याची शक्ती मिळावी, यासाठी देवीचरणी साकडे**

**दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी**

विदर्भातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असलेल्या कोराडी येथील श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थानमध्ये अश्विन नवरात्र महोत्सवानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दुपारी श्री महालक्ष्मी जगदंबा मातेचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी विधिवत पूजाअर्चा करून देवीचे आशीर्वाद घेतले. महाराष्ट्रातील दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासन या संकटाचा सामना करण्यासाठी सज्ज असून, शेतकऱ्यांनाही या कठीण परिस्थितीशी लढण्याची शक्ती मिळावी, असे साकडे मुख्यमंत्री फडणवीस यांनी देवीच्या चरणी घातले.



यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित भाविकांना नवरात्रोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. मंदिर व्यवस्थापनाच्या वतीने मुख्यमंत्र्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी राज्याचे महसूलमंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, गृह राज्यमंत्री पंकज भोयर, आमदार परिणय फुके, आमदार डॉ. राजीव पोतदार आदी मान्यवर उपस्थित होते.

**नवरात्रोत्सवात कोराडीमध्ये भाविकांची मांदियाळी**

श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कोराडी येथे शारदीय नवरात्रोत्सव दरवर्षी मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा केला जातो. यंदाही नवरात्रोत्सवाला धार्मिक परंपरेनुसार उत्साहात प्रारंभ झाला असून, दुसऱ्या दिवशी आई श्री महालक्ष्मी जगदंबेच्या स्वयंभू मूर्तीचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविकांनी मंदिरात गर्दी केली. मध्यरात्रीपासूनच भाविकांनी दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. जय माता दी आणि आई जगदंबेचा विजय असो, अशा जयघोषांनी संपूर्ण मंदिर परिसर दुमदुमून गेला. विदर्भासह महाराष्ट्राच्या विविध भागांतून तसेच इतर राज्यांतूनही भाविक मोठ्या संख्येने कोराडी येथे दाखल होत आहेत. नवरात्रोत्सवामुळे संपूर्ण परिसरात भक्ती, श्रद्धा आणि धार्मिक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**यज्ञ, जप आणि हवनाने मंदिर परिसर भक्तिमय**

अश्विन नवरात्रोत्सवानिमित्त संस्थानमध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. देवीच्या आराधनेसाठी यज्ञ, जप आणि हवनाचे विधी पार पडत असून, वैदिक मंत्रोच्चारांमुळे मंदिर परिसरात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले आहे. नवरात्रोत्सवाच्या संपूर्ण कालावधीत दुर्गा सप्तशतीचे पठण सुरू राहणार असून, विविध पूजाविधी आणि धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून देवीची आराधना केली जाणार आहे.

नवरात्र हा आदिशक्तीच्या उपासनेचा, श्रद्धेचा आणि भक्तीचा महत्त्वपूर्ण उत्सव मानला जातो. या उत्सवाच्या निमित्ताने भाविक आई श्री महालक्ष्मी जगदंबेच्या चरणी नतमस्तक होऊन कुटुंबाच्या सुख-समृद्धीसह समाजाच्या कल्याणासाठी प्रार्थना करीत आहेत.

भाविकांसाठी संस्थान प्रशासनाकडून विशेष व्यवस्था

नवरात्रोत्सवात भाविकांची मोठी गर्दी लक्षात घेऊन श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान प्रशासनाच्या वतीने दर्शन व्यवस्था, सुरक्षा, स्वच्छता, पिण्याचे पाणी आणि इतर आवश्यक सुविधांचे नियोजन करण्यात आले आहे. भाविकांना सुलभ, सुरक्षित आणि सुव्यवस्थितरीत्या देवीचे दर्शन घेता यावे, यासाठी आवश्यक व्यवस्था करण्यात आली आहे.

नवरात्रोत्सवाच्या पुढील दिवसांतही विविध धार्मिक कार्यक्रम आणि पूजाविधी सुरू राहणार आहेत. त्यामुळे आगामी काळातही मंदिरात भाविकांची मोठी गर्दी होण्याची अपेक्षा आहे. आई श्री महालक्ष्मी जगदंबेच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांमुळे कोराडी परिसरात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे. श्रद्धा, भक्ती आणि शक्तीचा संगम असलेल्या या नवरात्र महोत्सवात जय माता दी, च्या जयघोषाने संपूर्ण मंदिर परिसर भक्तिमय झाला आहे.

थोडक्यात

## लहान मुलांसोबत पालकांचीही होते विकसन : डॉ. अखिलेश पेशवे

**बाल जगतमध्ये श्रद्धेय ताई सुकळीकर स्मृती सप्ताहाचा समारोप**




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

बाल जगतमध्ये मुलांचा विकास होतो. बालविकास सप्ताहाच्या माध्यमातून मुलांना सक्षम बनवण्याचा प्रयास करण्याचे उत्तम कार्य बाल जगतमध्ये सुरू असून मुलांसोबत पालकांचे विकसन होत असल्याचे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू अखिलेश पेशवे यांनी केले. दीनदयाल शोध संस्थान, बाल जगतर्फे आयोजित करण्यात आलेल्या श्रद्धेय ताई सुकळीकर सप्ताहाचा बक्षीस वितरण कार्यक्रमाने समारोप झाला. त्यावेळी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बालजगतचे अध्यक्ष अभिनंदन पळसापुरे होते. यावेळी बालविकास सप्ताहाच्या मार्गदर्शिका दिवंगत छाया गाडे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

विविध स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या लिटिल लॉरिएट्स, भारतीय कृष्ण विद्या विहार, सक्षम सेवासदन, सांदिपनी विद्यालय या शाळांनी सादरीकरण केले. यावेळी व्हीएनआयटीचे मानसशास्त्राचे प्राध्यापक डॉ. योगेश देशपांडे व सांदिपनी शाळेच्या माजी शिक्षिका स्मिता बोकारे यांचा निःस्वार्थ सेवेबद्दल सत्कार करण्यात आला. अभिनंदन पळसापुरे यांनी बालजगत विषयी माहिती दिली. यावर्षी बाल विकास सप्ताहमध्ये ३९ शाळांनी सहभाग घेतला होत, असे ते म्हणाले. सर्वाधिक पुरस्कार प्राप्त करणाऱ्या सांदिपनी विद्यालयाला स्व. प्रकाशराव गाडे स्मृती चषक प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रद्धा श्रोती व वर्षा कपले यांनी केले. कार्यक्रमाला निवृत्त न्या. मीरा खडक्कार, जयंत जोशी, पंकज महाजन, संजय भाकरे, कल्याणी सास्तुरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रम सप्ताह प्रमुख उत्तरा नवरे यांच्या मार्गदर्शनात अकल्पिता डिग्रजकर, विजया पत्की, श्रद्धा श्रोती, मंजुषा सुपेकर, प्रतिमा माटेगावकर, वर्षा कपले, विनिता मानेकर, मीना जोशी, अंजली पांडे , रमा पिंपळीकर, अनुराधा देशमुख यांनी परिश्रम केले.

## मानव विकास योजनेतील सायकलींची प्रतीक्षा कायम!

**शैक्षणिक सत्र २०२५-२६ मधील विद्यार्थिनींना अद्याप सायकली मिळाल्या नाहीत, पालक आणि विद्यार्थिनींमध्ये असंतोष वाढला**

**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**



ग्रामीण तसेच दुर्गम भागातील विद्यार्थिनींना शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्यासाठी आणि शाळांमधील त्यांची उपस्थिती वाढविण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या मानव विकास योजनेअंतर्गत मिळणाऱ्या सायकलींची प्रतीक्षा अद्याप संपलेली नाही. शैक्षणिक सत्र २०२५-२६ मध्ये पात्र ठरलेल्या विद्यार्थिनींना अद्याप सायकली मिळाल्या नसल्याने पालक आणि विद्यार्थिनींमध्ये असंतोष वाढत आहे.

**योजनेचा उद्देश अपूर्ण; विद्यार्थिनींना प्रवासासाठी अडचणी**

मानव विकास योजनेअंतर्गत दूरवरून शाळेत येणाऱ्या इयत्ता आठवी ते बारावीपर्यंतच्या पात्र विद्यार्थिनींना दरवर्षी सायकली उपलब्ध करून देण्याची तरतूद आहे. विद्यार्थिनींना शाळेत ये-जा करताना होणाऱ्या अडचणी कमी करणे, त्यांची नियमित उपस्थिती वाढविणे तसेच शाळा अर्धवट सोडण्याचे प्रमाण कमी करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. मात्र, शैक्षणिक सत्र २०२५-२६ संपल्यानंतरही पात्र विद्यार्थिनींना सायकली मिळालेल्या नसल्याने योजनेच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. लांबचा प्रवास करून शाळेत येणाऱ्या विद्यार्थिनींना ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

**पालकांमध्ये नाराजी; प्रशासनाकडून कार्यवाहीची मागणी**

सायकली मिळण्याच्या प्रतीक्षेत असलेल्या विद्यार्थिनी आणि त्यांच्या पालकांमध्ये आता निराशा दिसून येत आहे. विद्यार्थिनींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या या योजनेचा लाभ वेळेत मिळायला हवा, अशी अपेक्षा पालकांकडून व्यक्त केली जात आहे. शैक्षणिक सत्र सुरू असतानाच सायकली उपलब्ध करून दिल्यास विद्यार्थिनींना नियमितपणे शाळेत येणे अधिक सोयीचे होऊ शकते. त्यामुळे संबंधित विभागाने या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन सायकल वितरणाची प्रक्रिया लवकर पूर्ण करावी, अशी मागणी होत आहे.

**विद्यार्थिनींना सायकली मिळणार तरी कधी ?**

शैक्षणिक सत्र २०२५-२६ मधील पात्र विद्यार्थिनींना सायकली नेमक्या कधी मिळणार, हा प्रश्न आता उपस्थित होत आहे. संबंधित विभागाने सायकल वितरणाबाबतची सद्यस्थिती स्पष्ट करून पात्र विद्यार्थिनींना लवकरात लवकर सायकली उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. विद्यार्थिनींच्या शिक्षणाशी संबंधित या महत्त्वाच्या प्रश्नाकडे प्रशासन कधी लक्ष देणार आणि मानव विकास योजनेचा लाभ विद्यार्थिनींना नेमका कधी मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**प्रमुख मागणी**

शैक्षणिक सत्र २०२५-२६ मधील पात्र विद्यार्थिनींना तातडीने सायकलींचे वितरण करण्यात यावे, जेणेकरून त्यांना प्रवासातील अडचणींपासून दिलासा मिळेल आणि त्यांचे शिक्षण विनाअडथळा सुरू राहील.

## चघळलेल्या सुपारीच्या तुकड्यांनी उलगडले वृद्ध महिलेच्या हत्येचे गूढ, शेजारीच निघाला आरोपी!

**पळसगाव (राका) येथील ८१ वर्षीय कुसुमबाई कापगते यांच्या हत्या व दागिने चोरी प्रकरणाचा उलगडा, डीएनए चाचणी ठरली निर्णायक, दुर्गीपार पोलिसांसह स्थानिक गुन्हे शाखेची संयुक्त कारवाई**

**दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया**

सडक अर्जुनी तालुक्यातील पळसगाव (राका) येथे एकट्या राहणाऱ्या ८१ वर्षीय वृद्ध महिला कुसुमबाई चैतराम कापगते यांच्या हत्या व सोन्याचे दागिने चोरी प्रकरणाचा गोंदिया स्थानिक गुन्हे शाखा आणि दुगीर्पार पोलिसांनी यशस्वीरीत्या उलगडा केला आहे. या प्रकरणात मृत महिलेच्या घराशेजारी राहणाऱ्या विलास किशन मेश्राम (वय ४२) याला अटक करण्यात आली आहे. घटनास्थळी आढळलेल्या चघळलेल्या सुपारीच्या तुकड्यांचे डीएनए नमुने आणि संशयिताचे नमुने जुळल्याने या गुन्ह्याचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले.



**घरात एकट्या असलेल्या वृद्ध महिलेची हत्या करून दागिने लंपास**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २ सप्टेंबर २०२६ रोजी फियार्दी पराग परमानंद कापगते यांनी डुग्गीपार पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. १ ते २ सप्टेंबरदरम्यानच्या रात्री पळसगाव (राका) येथील आपल्या घरात एकट्या असलेल्या कुसुमबाई कापगते यांच्या घरात अज्ञात व्यक्तीने चोरीच्या उद्देशाने प्रवेश केला. आरोपीने त्यांची हत्या करून त्यांच्या अंगावरील दोन सोन्याच्या बांगड्या, एक सोन्याची अंगठी आणि सोन्याचे मणी असलेली काळी पोत असा एकूण १ लाख ३२ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला.

या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली होती. दुर्गीपार पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करून तपास सुरू करण्यात आला.

**घटनास्थळी सापडलेली सुपारी ठरली महत्त्वाचा पुरावा**

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक गोरख भामरे यांनी घटनास्थळी भेट देऊन तपासाच्या सूचना दिल्या. त्यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा आणि दुगीर्पार पोलिसांनी संयुक्तपणे तपास सुरू केला.

सुरुवातीला घटनास्थळावरील सीसीटीव्ही चित्रण, बोटांचे ठसे, श्वानपथक आणि मोबाईल फोनच्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले. मात्र, या तपासातून सुरुवातीला ठोस निष्कर्ष हाती लागला नाही. दरम्यान, घटनास्थळी मृत महिलेच्या अंगावरील दागिने काढताना झालेल्या झटापटीच्या परिसरातून चघळलेल्या सुपारीचे काही तुकडे मिळाले. पोलिसांनी हे तुकडे जप्त करून डीएनए तपासणीसाठी न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळा, नागपूर येथे पाठवले. तसेच गावातील चार संशयित व्यक्तींचे रक्तनमुनेही तपासणीसाठी पाठवण्यात आले.

**आर्थिक अडचणी आणि सराफांशी संपर्कातून संशय बळावला**

तपासादरम्यान पळसगाव येथील विलास किशन मेश्राम हा गंभीर आर्थिक अडचणीत असून त्याच्यावर कर्जाचा मोठा बोजा असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. तसेच त्याने सडक अजुर्नी, सौंदड आणि भंडारा जिल्ह्यातील लाखनी येथील सराफा व्यावसायिकांशी मध्यस्थांमार्फत संपर्क साधल्याचे तपासात समोर आले.

या माहितीच्या आधारे पोलिसांनी संशयिताच्या हालचाली आणि इतर बाबींची सखोल चौकशी केली. न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळेतून प्राप्त झालेल्या डीएनए अहवालात घटनास्थळी सापडलेल्या सुपारीच्या तुकड्यांवरील नमुना आणि संशयित विलास मेश्राम याचा डीएनए नमुना जुळल्याचे निष्पन्न झाले. या महत्त्वपूर्ण वैज्ञानिक पुराव्यामुळे तपासाला निर्णायक दिशा मिळाली.

**पोलिसांच्या संयुक्त पथकाची कामगिरी**

डीएनए अहवाल आणि इतर तपासातून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी विलास मेश्राम याला ताब्यात घेऊन चौकशी केली.व त्याला अटक करण्यात आली. वृद्ध महिलेची हत्या करून सोन्याचे दागिने चोरून नेल्याच्या प्रकरणात पोलिसांनी आरोपीविरुद्ध पुढील कायदेशीर कारवाई सुरू केली आहे.

या प्रकरणाचा तपास पोलीस अधीक्षक गोरख भामरे आणि अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक रेवचंद सिंगनजुडे यांच्या मार्गदर्शनात तसेच डुग्गीपार पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी यांच्या सहकार्याने ही कारवाई पार पडली. वैज्ञानिक पुरावे, तांत्रिक तपास आणि पोलिसांच्या समन्वित प्रयत्नांमुळे वृद्ध महिलेच्या हत्या प्रकरणाचा उलगडा झाल्याने या तपासाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

## पिटेझरीच्या जंगलातील अनुभवांतून साकारल्या 'रानगोष्टी'

**किरण पुरंदरे लिखित पुस्तकाचे थाटात प्रकाशन**



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

पुण्यातील शहरी जीवनातून बाहेर पडत नागझिरा अभयारण्यातील पिटेझरी येथे तब्बल ४०० दिवस राहण्याचा अनुभव, जंगलाशी जुळलेले भावबंध आणि निसर्गाच्या सान्निध्यात घडलेल्या असंख्य घटनांचा वेध घेणारे निसर्गमित्र किरण पुरंदरे लिखित 'रानगोष्टी - नागझिऱ्यातील पिटेझरीतल्या जंगलझाडीत दडलेल्या' या पुस्तकाचे रविवारी थाटात प्रकाशन करण्यात आले. बी. आर. मुंडले हायस्कूलमधील नवदृष्टी सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमाला ज्येष्ठ पत्रकार नंदू अंधारे, पर्वतारोहक सचिन कोलारकर आणि किरण पुरंदरे उपस्थित होते.

किरण पुरंदरे यांनी नापिता म्हणजेच भारद्वाज पक्ष्याचा आवाज, इतर पक्ष्यांच्या आवाजांची नक्कल करणारा भृंगराज, शिट्ट्या वाजवणारा सुभग, जन्मापासून मृत्यूपर्यंत झाडे लावणारा हारोळी आणि श्रीलंकेतून रात्रीचा प्रवास करून भारतात येणारा इंडियन पिट्टा अशा विविध पक्ष्यांची वैशिष्ट्ये सांगितली. या पक्षाचे हुबेहुब आवाज काढून त्यांनी उपस्थितांना जंगलाच्या अनोख्या दुनियेची सफर घडवली. यावेळी बोलताना ज्येष्ठ पत्रकार नंदू अंधारे यांनी किरण पुरंदरे यांच्यासोबत वर्ल्ड वाइल्डलाइफ फंडमध्ये काम करतानाच्या आठवणींना उजाळा दिला. रानगोष्टी या पुस्तकात सुमारे २५ गोष्टींचा समावेश असून, मोहाचे दिवस, पळस फुललेला अशा विविध विषयांतून जंगलातील जीवनाचे अनेक पैलू अतिशय सोप्या भाषेत आणि समावदात्म शैलीत किरण प्रकारे यांनी उलगल्या असल्याचे ते म्हणाले.

सचिन कोलारकर म्हणाले, पुण्यातील धकाधकीचे जीवन सोडून किरण पुरंदरे पिटेझरी येथे रमले. जंगलात ४०० दिवस वास्तव्य करून त्यांनी निसर्गाशी नाते जोडले. पाखरशाळेच्या माध्यमातून ते नव्या पिढीला निसर्गप्रेमाचे संस्कार देत असून, ४७ गावांत फळझाडांच्या वृक्षवाटिका उभारण्याचे कार्य त्यांनी केले आहे. किरण पुरंदरे हे आजच्या युगातील ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व आहेत, असे ते म्हणाले. अतिशय माहितीपूर्ण अशा या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल हरदास यांनी केले. कार्यक्रमाला अनघा पुरंदरे, समीर आचार्य, अमोद कविश्वर आदींची उपस्थिती होती.

## आमगावातील मोदी रेसिडेन्शियल परिसरात जलभरावामुळे नागरिक त्रस्त

**नहराचे पाणी वस्तीत शिरले; साप आणि विंचवांचा वावर वाढल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर**

**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

आमगाव येथील गोंदिया रोडवरील यू.पी.ए. सिटी आणि मोदी रेसिडेन्शियल परिसरात नहराचे तसेच पावसाचे पाणी साचल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. गेल्या अनेक आठवड्यांपासून परिसरात जलभरावाची समस्या कायम असून, पाण्याचा निचरा करण्यासाठी प्रभावी व्यवस्था नसल्याने रहिवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी साचल्यामुळे नागरिकांना ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना याचा अधिक त्रास





सहन करावा लागत आहे. दीर्घकाळ पाणी साचून राहिल्याने अस्वच्छता वाढण्याबरोबरच डासांचा प्रादुर्भाव आणि विविध आजारांचा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.

**साप आणि विंचवांचा वावर वाढल्याने भीतीचे वातावरण**

जलभरावामुळे परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही गंभीर बनला आहे. साचलेल्या पाण्यामुळे आणि परिसरातील अस्वच्छतेमुळे साप व विंचू यांसारखे विषारी जीव वस्तीत दिसून येत असल्याचे रहिवाशांनी सांगितले. नुकतेच रात्रीच्या वेळी परिसरात फिरत असताना एका रहिवाशाला साप दिसून आला. या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

**कायमस्वरूपी जलनिचरा व्यवस्था करण्याची मागणी**

या समस्येची गांभीयार्ने दखल घेऊन नगर परिषद प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे. साचलेले पाणी त्वरित बाहेर काढणे, परिसरात व्यापक स्वच्छता मोहीम राबविणे, कीटकनाशकांची फवारणी करणे तसेच साप आणि विंचवांपासून नागरिकांच्या संरक्षणासाठी आवश्यक उपाययोजना करणे गरजेचे आहे.

यासोबतच नहराचे आणि पावसाचे पाणी साचू नये, यासाठी योग्य नाल्यांची निर्मिती करून कायमस्वरूपी जलनिचरा व्यवस्था उभारण्याची आवश्यकता आहे. दरवर्षी उद्भवणाऱ्या या समस्येवर केवळ तात्पुरते उपाय न करता ठोस आणि दीर्घकालीन उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा रहिवाशांनी व्यक्त केली आहे.

नगर परिषद प्रशासनाने या समस्येची तातडीने दखल घेऊन संबंधित परिसराची पाहणी करावी आणि नागरिकांना दिलासा देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी यू.पी.ए. सिटी व मोदी रेसिडेन्शियल परिसरातील रहिवाशांकडून करण्यात येत आहे.

निवेदन देतेवेळी राकेश मोदी, अजय अग्रवाल, जितेंद्र टेंभरे, अनिल अग्रवाल, उर्मिला ब्राह्मणकर,गायत्री बारसे, लीला बडोले, माही टेंभरे, पूजा मोदी, प्रीती हत्तीमारे तसेच इतर नागरिक उपस्थित होते.

थोडक्यात

## माँ कालंका मंदिर येथे शारदीय नवरात्रौत्सव प्रारंभ



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक- हर्ष कनोजे**

कालंका देवी म्हणजे कालीदेवीचे स्वरूप, महाकालीचे प्रतिक आहे. तिलाच आदिशक्तीचेही एक प्रतीक मानले जाते.भक्तांचा विश्वास आहे की,भक्तांची श्रद्धा उत्कट झाल्यास दृष्यरूपाने व्यक्त होवून देवी साक्षात दर्शन देते.रामटेक येथील मॉ कालंका देवी मंदिरात नवरात्रोत्सवा दरम्यान देवीच्या दर्शनासाठी भक्तांची मोठी गर्दी असते. दूर-दूरून भक्त दर्शनासाठी येतात. या पार्श्वभूमीवर मंदिर व्यवस्थापनाने नवरात्र उत्सवाची जय्यत तयारी केली आहे. कालंका(कालका)देवी मंदिर फार पुरातन म्हणजे राष्ट्रकूट कालीन इ.स. ८ ते ९ व्या शतकातले आहे. मंदिरात कालंका देवीची सुरेख अशी संगमरवरी ४ फुटाची मुर्ती आहे. प्राचीन स्थापत्य कलेच्या दृष्टीकोनातून विचार करता हे मंदिर गडमंदिरावरील वाकाटक कालीन नरसिंह मंदिरानंतरच्या मंदिर स्थापत्य रचनेत झालेला प्रगतीचा टप्पा दाखवणारे मंदिर आहे हे मंदिर प्राचिन गडमंदिर निगडीत असून पूर्वी या मंदिराची देखरेख गडमंदिर प्रशासनाकडे होती, पण रामटेक शहराच्या उत्तर टोकाला पूर्वमुखी असलेल्या या मंदिरात गर्भगृह व मंडप असे दोन प्रमुख भाग आहेत.

मंदिराचे संपूर्ण बांधकाम वालूका पाषाणातील आहे. मंदिराचे शिखर अर्धवतुर्ळावर पद्म नक्षींनी अलंकृत असुन गजपृष्ठाकृती म्हणजेच हत्तीच्या पाठीच्या आकाराचे आहे. मंदिर हे प्राचीण स्थापत्यकलेचा एक उत्कृष्ट नमुना मानला जातो. हे मंदिर प्राचिन गडमंदिर निगडीत असून पूर्वी या मंदिराची देखरेख गडमंदिर प्रशासनाकडे होती पण मात्र मंदिराची फार पडझड अवस्था होती. मात्र गडमंदिर चे काही काळ प्रतोद असलेले मधुकरराव पिपरोदे यांनी सन१९८२ मध्ये कालंका मंदिर ची पहिली जिणोर्धार कमेटी स्थापन करीत मंदिराच्या जिणोर्धाराला सुरवात सर्वप्रथम मंदिराच्या गर्भगृहातील देखभाल दुरुस्ती केली. नवरात्र उत्सवाला सुरुवात केली. विविध उत्सव लकी ड्रॉ व देणगीदारांच्या सहकायार्ने कायापालट करीत स्व. मधुकरराव पिपरोदे यांच्या दिमतीला बंजरग फोरम, मघुकर सायरे, अरविंद अंबागडे,दुर्गेश खेडगरकर, बबन क्षिरसागर अरुण पोकळे, सुभाष बघेले, सुधाकर सायरे, रुपेश खेडगरकर, अशोक पटेल, राजू कुरेशी, चद्रकांत ठक्कर यांनी कालंका मंदिर जिर्णोधर करण्यात मोठा सक्रिय सहभाग घेतला आता भव्य दिव्य मॉ कालंका मंदिरात नवरात्री उत्सव मध्ये परिसरातील भावीक पहाटे आरती करीता मोठी गर्दी असते, मात्र नवरात्री लाच नाहीतर वर्षभर मंदिरामध्ये भाविक दर्शनाला येतात. काही भाविक नवसाला पावणारी देवी असल्याचे सांगितले जाते.

कालंका मंदिर कमेटीचे अध्यक्ष मधुकर सहारे,सुधाकर सहारे, दिलीप देशमुख, अनिल भोरसले, अरविंद अंबागडे, रमेश कोठारी, चंद्रकांत ठक्कर, दयाराम रेवतकर,बबन क्षीरसागर, अरूण पोकळे, नत्थू घरजाळे, दुर्गेश खेडगरकर, रीतेश चौकसे, सुमित कोठारी, निर्भय घाटोळे, महेंद्र माकडे, रवी महाजन, वसंत डामरे आदि सेवक व्यवस्थेची तयारी करीत आहेत.

## चिमुकल्या बाळाचे अपहरण करुन विक्री, महिलांची टोळी अटकेत

**ठाणे :** लहान मुलांचे अपहरण करुन त्यांची विक्री करणाऱ्या टोळीचा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. अंबरनाथमधून विक्री करण्यासाठी अपहरण केलेल्या २५ दिवसाच्या बालकाचा शोध पोलिसांनी लावला. तांत्रिक तपासाच्या आधारे अवघ्या चार तासात पोलिसांनी चार आरोपी महिलांना जेरबंद करून २५ दिवसाच्या बालकाला आई-वडिलांच्या स्वाधीन केले. मात्र, या घटनेमुळे पुन्हा एकदा लहान मुलांच्या तस्करीचे रॅकेट आणि चिमुकल्यांच्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.

अंबरनाथमधील सदरील घटना ही दोन दिवसांपूर्वी घडली होती. मुलाचे अपहरण झाल्यानंतर आई-वडिलांसह नातेवाईकांनी या बालकाचा शोध घेतला. परंतु नवजात बाळ सापडून न आल्यानं अखेर आई-वडिलांनी पोलीस ठाणे गाठले. याच तक्रारीवरून पोलिसांनी प्रकरणाचा छडा लावत महिला आरोपींना ताब्यात घेतलं. संतोष वाघे यांचे नवजात बाळ एका मुक्या महिलेने हिसकाहून पळ काढला होता. आई-वडिलांनी या बालकाचा शोध घेतला मात्र ते आढळून आले नाही. धक्कादायक बाब म्हणजे सदरील बाळ हे एका महिलेला विक्री देखील करण्यात आले होते. परंतु, तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी उल्हासनगर ते अंबरनाथ मार्गावर शोध घेतला. त्यावेळी, अंबरनाथ रेल्वे स्थानकावरुन सदरील बाळाला महिलेकडून ताब्यात घेण्यात आले. या घटनेनंतर पोलिसांनी अधिक तपास सुरू केला आहे. दरम्यान, अटक केलेल्या महिलांची मुले चोरण्याची टोळी आहे का? याचा देखील तपास पोलिसांकडून केला जातोय. दरम्यान चोरी केलेले बाळ हे गुजरातला पाठविले जाणार होते, अशी माहिती पोलीस तपासात उघड झाली. त्यामुळे या टोळीचे गुजरात कनेक्शन नेमकं काय याचा देखील तपास केला जातोय. मात्र, या घटनेमुळे लहान मुलांच्या सुरक्षेसाठी पालकांनी देखील अधिक खबरदारी घेण्याची गरज व्यक्त होत आहे.

## डंपिंग ग्राऊंडवर कर्मचाऱ्याला मारहाण

**मुंबई :** डोंबिवलीतील शिवसेना शिंदे गटाचे नगरसेवक रमेश म्हात्रे यांच्या मारहाणीचे प्रकरण ताजे असताना भाजपा पदाधिकाऱ्याकडून डंपिंग ग्राउंड कर्मचाऱ्याला भाजपा आमदार सुलभा गायकवाड समोरच मारहाण करण्यात आल्याची घटना घडली आहे. कल्याण पश्चिमेतील उंबर्डा डम्पिंग ग्राउंडची भाजप आमदार सुलभा गायकवाड यांच्याकडून पाहणी दौरा दरम्यान राडा झाला. कर्मचाऱ्यांकडे ओळखपत्रे नसल्याने आमदारांसह भाजप पदाधिकारी संतापले. त्यानंतर, डम्पिंग ग्राउंडवरील सुपरवायझर किरण रसाळ यांच्यावर संताप केला व्यक्त, भाजप जिल्हा उपाध्यक्ष विजय जोशी यांच्याकडून सुपरवायझर किरण रसाळला शिवीगाळ करत मारहाण करण्यात आली.

# पदवीधरांच्या हक्कांसाठी 'मिशन जॉब्स' आणि 'मिशन एक्झाम'चा संकल्प

### कॉँग्रेस, महाविकास आघाडीचे ॲड. अभिजित वंजारी यांचा निवडणूक जाहीरनामा प्रसिद्ध, पेपरफुटीला आळा, रोजगाराच्या संधी, कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षण आणि शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांवर भर

**दै सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी कॉँग्रेस व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आमदार ॲड. अभिजित गोविंदराव वंजारी यांनी पदवीधरांच्या न्याय्य हक्कांचे संरक्षण, रोजगारनिर्मिती, परीक्षा पद्धतीत सुधारणा आणि भविष्यवेधी कौशल्य विकासावर भर देणारा निवडणूक जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. मिशन जॉब्स आणि मिशन एक्झाम या दोन संकल्पनांच्या माध्यमातून पदवीधर, बेरोजगार तरुण, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर ठोस उपाययोजना करण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे.

नागपुरातील दत्तात्रय नगर येथील जनसंपर्क कार्यालयात आज (ता. १२) आयोजित पत्रपरिषदेत आमदार अभिजित वंजारी यांनी जाहीरनामा प्रसिद्ध केला. यावेळी त्यांनी जाहीरनाम्यात समाविष्ट करण्यात आलेल्या मुद्यांची आणि आतापर्यंत केलेल्या कामांची माहिती पत्रपरिषदेत दिली.

नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या पूर्व विदर्भातील सहा जिल्ह्यांतील पदवीधरांना केंद्रस्थानी ठेवून हा जाहीरनामा तयार करण्यात आला आहे. रोजगाराच्या संधी वाढविणे, स्थानिक उद्योगांना चालना देणे, स्पर्धा परीक्षांमधील पारदर्शकता, डिजिटल शिक्षण, सामाजिक न्याय आणि शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न सोडविणे या प्रमुख मुद्द्यांचा त्यात समावेश असल्याचे त्यांनी सांगितले.

**रोजगारनिर्मिती आणि आधुनिक कौशल्य विकासावर भर**

मिशन जॉब्स अंतर्गत पदवीधरांना रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध करून देणे, स्थानिक पातळीवर उद्योग-उद्योजकतेला प्रोत्साहन देणे आणि बदलत्या तंत्रज्ञानानुसार तरुणांना प्रशिक्षित करण्याचा संकल्प जाहीरनाम्यात व्यक्त करण्यात आला आहे. पूर्व विदभार्तील सहाही जिल्ह्यांत कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), डेटा सायन्स आणि डिजिटल तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देणारी एआय डिस्ट्रिक्ट हब्स स्थापन करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.

स्पर्धा परीक्षा आणि करिअर मार्गदर्शनासाठी सहाही जिल्ह्यांच्या मुख्यालयात डॉ. श्रीकांत जिचकार यांच्या नावाने पदवीधर भवन उभारण्याचा प्रस्ताव आहे. या भवनांमध्ये स्पर्धा परीक्षा अभ्यासिका, डिजिटल ई-लायब्ररी, करिअर समुपदेशन केंद्र आणि स्टार्टअप इनक्युबेटर यांचा समावेश असेल. नामांकित कंपन्यांच्या सहभागातून रोजगार मेळावे आयोजित करणे, बेरोजगार तरुणांसाठी मासिक पाच हजार रुपयांचा बेरोजगारी भत्ता मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे आणि स्थानिक उद्योगांमध्ये स्थानिक पदवीधरांना रोजगाराची संधी मिळावी यासाठी वैधानिक हमीच्या दिशेने प्रयत्न करण्याचेही जाहीरनाम्यात नमूद असल्याचे त्यांनी सांगितले.

**पेपरफुटीविरोधात कठोर उपाययोजनांचा निर्धार**

स्पर्धा परीक्षांमधील पेपरफुटी रोखणे, परीक्षा प्रक्रिया पारदर्शक करणे आणि निकाल व नियुक्त्या वेळेत होण्यासाठी सुधारणा करणे, हा मिशन एक्झामचा मुख्य उद्देश आहे. शासकीय भरती प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरती घेण्याचा आग्रह, स्वतंत्र परीक्षा आयोगाची स्थापना आणि स्पर्धा परीक्षांसाठी एकदाच नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.

स्पर्धा परीक्षांच्या तणावाचा सामना करणाऱ्या बेरोजगार तरुणांसाठी मोफत समुपदेशन आणि मानसोपचार हेल्पलाईन सुरू करण्याचा प्रस्तावही मांडण्यात आला आहे. एमपीएससी व इतर स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली मोफत कार्यशाळा आयोजित करण्यावर भर देण्यात



आला आहे.

**शिक्षक, कर्मचारी आणि सामाजिक न्यायाचे प्रश्न**

शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांमध्ये जुनी पेन्शन योजना, विनाअनुदानित शाळांना टप्पा अनुदान, कॅशलेस वैद्यकीय प्रतिपूर्ती, शालार्थ आयडी, संच मान्यता, प्राध्यापकांच्या पदोन्नती आणि शिक्षकांना अशैक्षणिक कामांतून मुक्त करणे या विषयांचा समावेश आहे. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी आश्वासित आणि कालबद्ध प्रगती योजना लागू करण्यासाठी तसेच टीईटी परीक्षा रद्द करण्यासाठी प्रयत्न करण्याचेही नमूद करण्यात आले आहे.

मागासवर्गीय, ओबीसी आणि अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी राज्यातील ३६ जिल्ह्यांत प्रत्येकी दोन सुसज्ज शासकीय वसतिगृहे उभारण्यासाठी पाठपुरावा करणे, महाज्योती, सारथी, बार्टी, टार्टी आणि मार्टी या संस्थांच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे, विद्यार्थ्यांसाठी अर्थसंकल्पीय तरतूद वाढविणे, ओबीसींची जातनिहाय जनगणना आणि क्रिमी लेअरची मयार्दा वाढविण्यासाठी प्रयत्न करणे, अशा बाबींचाही जाहीरनाम्यात समावेश असल्याची माहिती आ. अभिजित वंजारी यांनी यावेळी दिली.

**मागील सहा वर्षांतील कामांचा आढावा**

जाहीरनाम्यात मागील सहा वर्षांतील कामांचाही आढावा मांडला असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. ते म्हणाले, पदवीधर मतदारसंघातील सहाही जिल्ह्यांत त्यांनी साडेतीन लाख किलोमीटरहून अधिक प्रवास करून नागरिकांशी संपर्क साधला. विधान परिषदेत प्रश्न, तारांकित प्रश्न, चर्चा आणि धोरणात्मक मुद्द्यांच्या माध्यमातून ३५० हून अधिक वेळा जनहिताचे विषय उपस्थित केले.

# राशन में गेहूं की जगह मिला मक्का, गरीब जनता के साथ शासन का भद्दा मजाक!

### गोंदिया जिले में सार्वजनिक वितरण प्रणाली को लेकर लोगों में असंतोष, लाभार्थियों ने उठाई गेहूं उपलब्ध कराने की मांग

**दै. सिंहवाणी वृत्त, प्रकाश टेंभरे, गोंदिया**

गरीब और जरूरतमंद परिवारों को सस्ती दरों पर खाद्यान्न उपलब्ध कराने के उद्देश्य से संचालित सार्वजनिक वितरण प्रणाली अब जिले के कई राशन उपभोक्ताओं के बीच चर्चा का विषय बन गई है। उपभोक्ताओं की शिकायत है कि जहां पहले राशन में गेहूं और चावल दिया जाता था, वहीं अब गेहूं की जगह मक्का वितरित किया जा रहा है। इससे उन परिवारों के सामने परेशानी खड़ी हो गई है, जिनके रोजमर्रा के भोजन में मक्का शामिल नहीं है।

**गेहूं की जगह मक्का, आखिर कैसे चलेगा गरीब परिवारों का काम?**

गोंदिया जिले के कई परिवारों के दैनिक भोजन में गेहूं की रोटी प्रमुख स्थान रखती है। ऐसे में राशन में गेहूं के स्थान पर मक्का मिलने से उपभोक्ता असमंजस में हैं। लोगों का कहना है कि राशन के माध्यम से मिलने वाला अनाज उनके परिवार की खाद्य जरूरतों को पूरा करने का महत्वपूर्ण साधन है। आर्थिक रूप से कमजोर परिवार बाजार से अपनी पसंद का अनाज खरीदने में भी सक्षम नहीं होते। ऐसे में राशन में मिलने वाले खाद्यान्न में बदलाव उनकी रोजमर्रा की जरूरतों को प्रभावित कर सकता है।

**मक्का खाने के बजाय पशुओं को खिलाने की मजबूरी?**

स्थानीय उपभोक्ताओं के अनुसार, मक्का उनकी नियमित भोजन व्यवस्था का हिस्सा नहीं होने के कारण कुछ लोग इसे पशुओं या मुर्गियों को खिलाने में इस्तेमाल कर रहे हैं, जबकि कुछ लोग इसे दुकानदारों को बेच रहे हैं। यह स्थिति सार्वजनिक वितरण प्रणाली के उद्देश्य पर सवाल खड़े करती है। यदि लाभार्थियों को मिलने वाला अनाज उनकी वास्तविक जरूरतों के अनुरूप नहीं है, तो खाद्यान्न वितरण की व्यवस्था और स्थानीय खानपान की आदतों के बीच तालमेल पर विचार करना आवश्यक है।

**गरीबों की मजबूरी का फायदा तो नहीं उठाया जा रहा?**

गरीब परिवारों के लिए राशन केवल सरकारी सुविधा नहीं, बल्कि भोजन की सुरक्षा का एक महत्वपूर्ण आधार है। ऐसे में लाभार्थियों की पसंद, स्थानीय खानपान और जरूरतों को नजरअंदाज किए जाने से उनमें असंतोष बढ़ना स्वाभाविक है। लोगों का सवाल है कि जब परिवारों को गेहूं की आवश्यकता है, तो उन्हें ऐसा अनाज क्यों दिया जा रहा है, जिसका उपयोग वे अपनी नियमित भोजन व्यवस्था में नहीं कर पा रहे हैं?

**याद आने लगा पुराना दौर, जब गेहूं की जगह आया था मक्का!**

अनाज वितरण में इस बदलाव ने कुछ लोगों को पुराने दौर की याद दिला दी है। चर्चा है कि कुछ दशक पहले भी गेहूं की कमी के बीच अमेरिका से आयातित मीलो वितरित किए जाने की स्थिति बनी थी। आज एक बार फिर गेहूं के स्थान पर मक्का मिलने से लोग उस दौर से इसकी तुलना कर रहे हैं। हालांकि, वर्तमान वितरण व्यवस्था के पीछे के कारणों और पुराने घटनाक्रम के बीच समानता की पुष्टि के लिए संबंधित सरकारी आंकड़ों और अभिलेखों की जांच आवश्यक है।

**शासन-प्रशासन से गेहूं उपलब्ध कराने की मांग**

राशन उपभोक्ताओं की मांग है कि सार्वजनिक वितरण प्रणाली के माध्यम से उनकी जरूरतों के अनुरूप गेहूं उपलब्ध कराया जाए। लोगों का कहना है कि खाद्यान्न वितरण की योजना बनाते समय स्थानीय खानपान की आदतों और गरीब परिवारों की वास्तविक आवश्यकताओं को ध्यान में रखा जाना चाहिए।

अब देखना यह है कि संबंधित विभाग और जिला प्रशासन उपभोक्ताओं की शिकायतों पर क्या कदम उठाते हैं। गरीब परिवारों को राहत देने वाली राशन व्यवस्था तभी प्रभावी मानी जाएगी, जब उसके माध्यम से मिलने वाला अनाज उनकी भोजन संबंधी जरूरतों को पूरा करने में उपयोगी साबित हो। बड़ा सवाल यह है कि क्या राशन उपभोक्ताओं को उनकी जरूरत के अनुसार गेहूं उपलब्ध कराया जाएगा, या उन्हें मक्का से ही संतोष करना पड़ेगा?

## महायुतीत नाराजीनाट्याची चर्चा?

**मुंबई :** राज्यात पावसाअभावी दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात दुष्काळ जाहीर करण्यात आला असून शेतकऱ्यांसाठी मदत जारी करण्यात आली. दरम्यान राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय दुष्काळ पाहणी पथकासोबत महत्त्वाची बैठक घेतली. मात्र, या बैठकीला राज्याचे दोन्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार अनुपस्थित राहिल्याने राजकीय वर्तुळात विविध चर्चांना सुरुवात झाली आहे. दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी बैठकीचे निमंत्रण देण्यात आले होते की नाही, यावरूनही राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी केंद्रीय दुष्काळ पाहणी पथकासोबत ही बैठक पार पडली. राज्यातील दुष्काळी परिस्थिती, शेतीचे नुकसान आणि संभाव्य मदतीच्या उपाययोजनांच्या अनुषंगाने या बैठकीला महत्त्व प्राप्त झाले होते. या बैठकीला आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील, तसेच केंद्रीय दुष्काळ पाहणी पथकाचे प्रमुख आणि केंद्रीय संयुक्त सचिव मुक्तानंद अग्रवाल यांच्यासह पथकातील सदस्य उपस्थित होते. मात्र, राज्य सरकारमधील महत्त्वाचे घटक असलेल्या दोन्ही उपमुख्यमंर्त्यांची अनुपस्थिती लक्षवेधी ठरली. त्यामुळे महायुती सरकारमध्ये नेमके काय सुरू आहे, याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा रंगू लागल्या आहेत. या बैठकीसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांना निमंत्रण देण्यात आले नव्हते का? अशी चर्चा राजकीय वतुळात सुरू असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे दोन्ही नेते नाराज असल्याचीही चर्चा होत आहे. तसेच, दोन्ही उपमुख्यमंर्त्यांना बैठकीचे निमंत्रण देण्यात आले होते की नाही, याबाबतही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. दुष्काळासारख्या महत्त्वाच्या विषयावर झालेल्या बैठकीला दोन्ही उपमुख्यमंत्री अनुपस्थित राहिल्याने या प्रकरणाला राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. दरम्यान शेतकऱ्यांनी फक्त आश्वासन नको तर दिलेला शब्द पाळा आणि लवकरात लवकर दुष्काळग्रस्त शेतक-यांसाठी उपाययोजना लागू करण्याची मागणी केली आहे.

# नागपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दिवसा विजेसाठी महिनाअखेरपर्यंत पूर्ण वाहिन्या कार्यान्वित करण्याचे निर्देश

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर जिल्ह्यातील शेतीला समृद्धीचा आधार देण्यासाठी आणि बळीराजाला रात्रीच्या वेळेस शेतात राबण्याच्या त्रासातून कायमची मुक्ती देण्यासाठी महावितरणने 'आरडीएसएस वाहिनी विलगीकरण' योजनेतील कामांना अत्यंत उच्च प्राधान्य दिले आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दिवसा पूर्ण दाबाने, सुरक्षित आणि अखंडित वीजपुरवठा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महावितरणच्या वतीने या कामांचा वेग वाढवण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर महावितरण मुख्यालयातील प्रकल्प विभागाचे अधीक्षक



अभियंता देवेंद्र उंबरकर यांनी काटोल रोड येथील विद्युत भवन येथे आयोजित विशेष बैठकीत नागपूर परिमंडलातील या योजनेच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेतला.

या आढावा बैठकीदरम्यान ज्या वाहिन्यांचे काम १०० टक्के पूर्ण झाले आहे, अशा सर्व वाहिन्यांचे 'कार्यान्वयन' चालू ऑक्टोबर महिन्याच्या अखेरपर्यंत कोणत्याही परिस्थितीत पूर्ण करून त्या तातडीने प्रत्यक्ष सेवेत दाखल करण्याचे स्पष्ट व कडक निर्देश उंबरकर यांनी महावितरणचे अधिकारी आणि कंत्राटदार एजन्सीला दिले आहेत.

केंद्र सरकारच्या अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि कालमर्यादित 'आरडीएसएस' योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील कृषी आणि बिगर-कृषी (गावठाण व व्यावसायिक) ग्राहकांची वीज वाहिनी पूर्णपणे वेगळी करण्याचे काम नागपूर जिल्ह्यात वेगाने सुरू आहे. या विलगीकरणामुळे वीज वितरणातील तांत्रिक अडचणी दूर होऊन संपूर्ण प्रणाली अधिक सक्षम, आधुनिक आणि विश्वासार्ह होणार आहे. विजेच्या वाढत्या मागणीचे सुयोग्य नियोजन करणे महावितरणला शक्य होईल. या प्रकल्पाचा थेट आणि सर्वात मोठा फायदा जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांना होणार असून, त्यांना आता रात्रीच्या अंधारात शेताला पाणी देण्याच्या धोक्यापासून दिलासा मिळणार आहे. पिकांना आवश्यकतेनुसार दिवसाच भरवशाचा आणि पुरेसा वीजपुरवठा उपलब्ध होणार असल्याने शेती उत्पादकतेतही मोठी वाढ होणार आहे.

बैठकीचनंतर प्रकल्पांची प्रत्यक्ष स्थिती जाणून घेण्यासाठी अधीक्षक अभियंता देवेंद्र उंबरकर आणि नागपूर परिमंडलाच्या इन्फ्रा विभागाच्या अधीक्षक अभियंता दिपाली माडेलवार यांनी अधिकाऱ्यांच्या ताफ्यासह क्षेत्रीय पाहणी केली. त्यांनी सावनेर विभागातील फेटरी उपकेंद्रातील ११ केव्ही बुढला वाहिनी, कॉँग्रेसनगर विभागातील फेटरी वाहिनी तसेच काटोल तालुक्यातील ४ वाहिन्यांच्या कामांची प्रत्यक्ष स्थळावर जाऊन पाहणी केली. पाहणीदरम्यान कामाचा दर्जा तपासून उर्वरित किरकोळ कामे तातडीने संपवण्याच्या सूचना देण्यात आल्या. हा प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी महावितरणचे अभियंता व मे. पॉलीकॅब इंडिया लिमिटेडच्या प्रतिनिधींनी आपापसातील समन्वय अधिक मजबूत करून युद्धपातळीवर काम करावे, असे निर्देशही उंबरकर यांनी दिले.

या बैठकीस नागपूर इन्फ्रा विभागाचे सर्व सहाय्यक अभियंता, कर्मचारी आणि मे. पॉलीकॅब इंडिया लिमिटेडचे प्रतिनिधी सचिन महंत व मंगेश गुढाधे यांची प्रमुख उपस्थिती होती. फिडर विलगीकरणाची ही सर्व कामे निर्धारित वेळेत पूर्ण झाल्यामुळे संपूर्ण नागपूर जिल्ह्यातील वीजपुरवठ्याचे जाळे अधिक सुदृढ होणार असून, सर्वच वर्गवारीतील ग्राहकांना दर्जेदार व विनाखंड सेवेचा लाभ मिळणार आहे.

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com
Epaper : epaper.sinhvani.com

# सामाजिक न्यायासाठी चंद्रघंटा देवीची प्रेरणा

**नवरात्र विशेष - ३**

**शशिकांत तोटे,**
**दारव्हा, जि.यवतमाळ**

आदिशक्ती, जगज्जननी नवदुर्गेच्या नवरात्रोत्सवातील आजचा तिसरा दिवस. नवरात्रीतील देवीचे तिसरे रूप म्हणजे चंद्रघंटा देवी.मस्तकावर घंटेच्या आकाराची अर्धचंद्राकृती कोर धारण केलेली, सिंहावर आरूढ आणि विविध आयुधांनी सुसज्ज असलेली ही देवी शौर्य, सज्जता, निर्भयता आणि संकटांचा सामना करण्याच्या सामर्थ्याचे प्रतीक मानली जाते. तिचे हे रूप भक्तांमध्ये श्रद्धा निर्माण करते आणि अभयाचा संदेश देते. मात्र,चंद्रघंटा देवीचे रूप समाजासमोर एक महत्त्वाचा प्रश्नही उभा करते.

अन्याय आपल्या डोळ्यांसमोर घडत असताना आपण त्याविरुद्ध उभे राहण्याचे धैर्य दाखवतो का? देवीच्या हातातील आयुधे अन्यायाविरुद्धच्या संघर्षाची,तर घंटेचा नाद समाजजागृतीची प्रेरणा देतो. समाजात अन्याय, शोषण, दडपशाही, क्रौर्य आणि हिंसा दिसत असताना केवळ चांगल्या विचारांची चर्चा पुरेशी ठरत नाही. त्या विचारांच्या बाजूने प्रत्यक्ष कृती करण्याची तयारी समाजमनात निर्माण होणे आवश्यक असते. अशा वेळी चंद्रघंटा देवीचे प्रतीक धैर्य आणि कर्तव्याची जाणीव करून देते.

आजही स्त्रियांवरील अन्याय-अत्याचार,मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न, कौटुंबिक हिंसा, लैंगिक छळ, बालविवाह, स्त्री-पुरुष भेदभाव, अपहरण आणि मानसिक शोषण यांसारखी आव्हाने समाजासमोर आहेत. या समस्यांकडे केवळ कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून पाहून चालणार नाही;त्यामागील सामाजिक मानसिकतेतही परिवर्तन घडवून आणावे लागेल.

भारतीय संस्कृतीत देवीला शक्तीचे रूप मानून तिची पूजा केली जाते.मात्र, प्रत्यक्ष जीवनात स्त्रियांच्या सन्मानावर आघात होत असतील,तर या पूजेच्या सामाजिक अर्थाचा पुनर्विचार करण्याची वेळ येते.देवीच्या हातातील शस्त्रांचे सामर्थ्य तेव्हाच खऱ्या अर्थाने सार्थ ठरेल,जेव्हा समाजातील प्रत्येक स्त्रीला निर्भयपणे जगण्याचा, शिक्षण घेण्याचा, स्वतःचे निर्णय घेण्याचा आणि सन्मानाने जीवन जगण्याचा अधिकार मिळेल. स्त्रीसुरक्षा ही केवळ स्त्रियांची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाचे कर्तव्य आहे.



**कर्मकांडापलीकडील आध्यात्मिकतेचा जागर**

आज आध्यात्मिकतेच्या संकल्पनेचा अर्थ व्यापकपणे समजून घेण्याची गरज आहे. केवळ पूजा-अर्चा, नाचगाणे आणि कर्मकांड यांनाच अध्यात्म मानणे म्हणजे त्याच्या मूलभूत मूल्यांकडे दुर्लक्ष करणे होय. श्रद्धेच्या नावाखाली अंधश्रद्धा पसरवणाऱ्या, लोकांच्या असहायतेचा फायदा घेणाऱ्या भोंदूगिरीपासून सावध राहणेही काळाची गरज आहे.

खरे अध्यात्म माणसामाणसांतील विवेक, कर्तव्यनिष्ठा, सदाचार, निर्भयता,करुणा आणि समाजभान जागृत करण्यात आहे. दुसऱ्याच्या दुःखाशी नाते जोडणे, अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे आणि दुर्बलांना आधार देणे हीसुद्धा आध्यात्मिक साधनाच आहे.

नवरात्रातील चंद्रघंटा देवीचे रूप भयापुढे मान तुकवण्याऐवजी सत्याच्या मार्गावर ठामपणे चालण्याची शिकवण देते. भीती, स्वार्थ आणि अन्यायाविषयीची उदासीनता दूर केल्याशिवाय समाजात समता आणि न्यायाची पहाट उजाडू शकत नाही. अन्याय करणाऱ्याइतकेच अन्याय सहन करणारे आणि तो पाहूनही मौन बाळगणारे समाजमनही आत्मपरीक्षणाच्या कक्षेत यायला हवे.

**तरुणाईच्या हातात समाजपरिवर्तनाची मशाल**

समाजपरिवर्तनाच्या प्रत्येक टप्प्यावर तरुणाईची भूमिका निर्णायक ठरली आहे. आजच्या तरुणांकडूनही समाजाच्या मोठ्या अपेक्षा आहेत. अन्यायाविषयी चीड निर्माण होणे स्वाभाविक आहे; मात्र,ही चीड केवळ संतापापुरती मर्यादित न राहता जबाबदार कृतीतून व्यक्त होणे आवश्यक आहे.देशाचे जबाबदार नागरिक आणि समाजाचे आधारस्तंभ म्हणून तरुणाईने आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवली पाहिजे.

समाजमाध्यमांवर द्वेष पसरवणाऱ्या प्रवृत्तींना बळी न पडणे,असत्य आणि अप्रमाणित माहितीचा प्रसार टाळणे,स्त्रिया व बालकांच्या हक्कांचे संरक्षण करणे आणि अन्यायग्रस्तांना मदतीचा हात देणे,अशा कृतींतून तरुणाई आपले सामाजिक दायित्व पार पाडू शकते. संविधानाने अधोरेखित केलेल्या समता, स्वातंत्र्य,न्याय आणि बंधुता या मूल्यांचा आदर करून मानवतावादी समाजनिर्मितीसाठी पुढाकार घेणे ही आजच्या तरुणाईची महत्त्वाची जबाबदारी आहे.

चंद्रघंटा देवीची आराधना करताना तिच्या हातातील आयुधांपेक्षा तिच्या रूपातून मिळणारा निर्भयतेचा आणि अन्यायाविरुद्धच्या संघर्षाचा संदेश समजून घेणे अधिक आवश्यक आहे. देवीसमोर नतमस्तक होणारे मस्तक आणि प्रार्थनेसाठी जोडलेले हात समाजातील दुर्बल, दुःखी, वंचित आणि निराधार व्यक्तींना आधार देण्यासाठी पुढे आले, तर भक्तीला खरा सामाजिक अर्थ प्राप्त होईल.

मनात प्रेम, करुणा आणि सहवेदना असणे जितके महत्त्वाचे आहे,तितकेच ते प्रत्यक्ष कृतीत उतरवणेही आवश्यक आहे. अन्याय दिसल्यास त्याविरुद्ध आवाज उठवणे, पीडित व्यक्तीच्या पाठीशी उभे राहणे, भेदभाव नाकारणे आणि मानवी प्रतिष्ठेचे रक्षण करणे, हीच चंद्रघंटा देवीच्या प्रेरणेची खरी फलश्रुती ठरेल.

श्रद्धा विवेकाशी जोडली गेली, आध्यात्मिकता सामाजिक बांधिलकीत उतरली आणि निर्भयता न्यायाच्या रक्षणासाठी उभी राहिली,तरच चंद्रघंटा देवीची उपासना समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन बनेल. देवीच्या घंटेचा नाद केवळ मंदिरात घुमू नये; तो प्रत्येकाच्या विवेकाला जागवणारा आणि अन्यायाविरुद्ध समाजाला एकजुटीने उभे करणारा जागर ठरावा,हीच या नवरात्राची खरी प्रेरणा! शौर्य व शांततेची प्रतिक असलेल्या चंद्रघंटा देवीला नमन.

**- मो.९१३०८३५४५८**

## कर्तृत्ववान स्त्री—महिला सफाई कर्मचारी
## स्वच्छतेतून आरोग्य जपणारी, समाजाच्या आरोग्याची खरी रक्षक!

**सौ. माधुरी धनोकार, अकोला**

महिला सफाई कर्मचाऱ्यांना समर्पित चारोळी...

पहाटेपासून राबते ती,
स्वच्छतेचा ध्यास घेते, घाम गाळून श्रमातून, सुंदर परिसर घडवते; तिच्या कष्टांनी आरोग्याची, नवी पहाट उजळते, कर्तृत्ववान श्रमिक नारी, समाजाला दिशा देते!

स्त्री म्हणजे केवळ घराचा आधार नाही, तर समाजाच्या आरोग्याची आणि प्रगतीचीही एक महत्त्वाची शिल्पकार आहे. नवरात्रीत आपण देवीच्या विविध रूपांची पूजा करतो. मात्र, आपल्या आजूबाजूला अशीहीओ एक स्त्री आहे, जी दररोज आपल्या कष्टांतून समाजाचे जीवन अधिक स्वच्छ आणि आरोग्यदायी बनवते. ती म्हणजे महिला सफाई कर्मचारी!

पहाटेचा सूर्य उगवण्यापूर्वीच तिच्या दिवसाची सुरुवात होते. शहरातील रस्ते, गल्लीबोळ, सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ ठेवण्यासाठी ती हातात झाडू घेऊन कामाला लागते. उन्हाचा तडाखा असो, पावसाची संततधार असो किंवा हिवाळ्याची कडाक्याची थंडी असो, तिच्या कामात खंड पडत नाही. आपण स्वच्छ रस्त्यांवरून चालतो, स्वच्छ परिसरात श्वास घेतो; पण त्या स्वच्छतेमागे कोणाचे श्रम आहेत, याचा विचार अनेकदा करत नाही.

समाजात स्वच्छतेला महत्त्व दिले जाते; परंतु स्वच्छता करणाऱ्या हातांना अनेकदा अपेक्षित सन्मान मिळत नाही. कामाच्या ठिकाणी आरोग्याचे धोके, अपुऱ्या सुविधा, आर्थिक अडचणी आणि कुटुंबाची जबाबदारी अशा अनेक समस्यांना तोंड देत ही महिला आपले कर्तव्य पार पाडते. दिवसभर समाजाची सेवा केल्यानंतर घरी परतल्यावर ती पुन्हा संसाराच्या जबाबदाऱ्या सांभाळते.



तिचे कार्य केवळ रस्ते स्वच्छ करण्यापुरते मर्यादित नाही. स्वच्छ परिसरामुळे रोगराई रोखण्यास मदत होते, पर्यावरणाचे संरक्षण होते आणि नागरिकांच्या आरोग्याचे रक्षण होते. त्यामुळे तिच्या श्रमांचे महत्त्व ओळखणे ही केवळ सामाजिक जाणीव नसून आपली जबाबदारीही आहे.

आज गरज आहे ती या महिलांना सुरक्षित कामाचे वातावरण, आवश्यक सुरक्षा साधने, योग्य वेतन, आरोग्य सुविधा आणि सन्मान मिळवून देण्याची. स्वच्छतेची जबाबदारी केवळ सफाई कर्मचाऱ्यांची नसून प्रत्येक नागरिकाची आहे, ही जाणीव समाजात रुजवण्याचीही गरज आहे.

नवरात्रीत देवीच्या शक्तीला वंदन करताना या श्रमिक स्त्रीच्या कष्टांनाही सलाम करूया. तिच्या हातातील झाडूला कमीपणाचे नव्हे, तर समाजसेवेचे प्रतीक मानूया. कारण तिच्या श्रमांतूनच स्वच्छतेचा मार्ग खुला होतो आणि निरोगी समाजाची पायाभरणी होते.

**स्वच्छता राखणाऱ्या हातांचा सन्मान म्हणजे श्रमशक्तीचा सन्मान!**

**संदेश** : या नवरात्रीत आपल्या परिसरातील स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सन्मान करूया. कचरा योग्य ठिकाणी टाकूया, स्वच्छतेची जबाबदारी स्वीकारूया आणि त्यांच्या श्रमांना प्रतिष्ठा देऊया.

## लोकांची दिवाळी 'गोड' होणार!
## तुकारात मुंडेंची बदली नाही

**वृत्तसंस्था, मुंबई**

अन्नाच्या भेसळविरोधात मोर्चा उघडणारे धडाडीचे आयएएस अधिकारी तुकाराम मुंढेंच्या ताज्या सोशल मीडिया पोस्टमुळे दसरा-दिवाळीच्या तोंडावर राज्यातल्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. आपली बदली झाली नसून आपण एफडीए विभागातच कार्यरत असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. तसेच अन्नाच्या भेसळीविरोधात आपली लढाई सुरूच राहील असंही मुंढे यांनी म्हटलं आहे. त्यामुळे सणासुदीच्या काळात लोकांना किमान सुरक्षित अन्न मिळण्याच्या हमीची शक्यता आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील पेपरफुटीविरोधात आणि अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्यासाठी पुण्यामध्ये जवळपास ११ दिवस विद्यार्थ्यांनी आंदोलन पुकारलं



होतं. सोमवारी (१२ ऑक्टोबर) मध्यरात्रीच्या सुमारास मंत्री शिवेंद्रराजे यांच्या शिष्टाईमुळे हे आंदोलन मागे घेण्यात आलं. एमपीएससीमध्ये झालेल्या गैरकारभाराची चौकशी करण्यासाठी सरकारने एक चौकशी समिती नेमली आहे. या चौकशी समितीच्या सचिवपदी तुकाराम मुंढे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.राज्य शासनाच्या घोषणेनंतर काहीकाळ संभ्रमाचं वातावरण निर्माण झाल्याचं दिसून आलं. एमपीएससीच्या सचिवपदी तुकाराम मुंढे यांची नियुक्ती झाल्याच्या बातम्या पसरल्या. त्यानंतर अन्न आणि औषध विभागाचं काय होणार? राज्यातील अन्नाच्या भेसळीविरोधातील लढाईचं काय होणार? तुकाराम मुंढेंच्या बदलीनंतर ही लढाई कायम राहणार का? असे अनेक प्रश्न विचारण्यात येऊ लागले.

मात्र, तुकाराम मुंढे यांची बदली झाली नाही, त्यांनी फक्त एमपीसएसीच्या चौकशी समितीच्या सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे असं सरकारने स्पष्ट केलं. त्यानंतर आता खुद्द तुकाराम मुंढे यांनीच सोशल मीडियावर एक पोस्ट लिहून त्यावर स्पष्टीकरण दिलं आहे. तुकाराम मुंढे यांनी त्यांच्या पोस्टमध्ये लिहिलंय की, "माझी एफडीएमधून बदली झालेली नाही. मी अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र येथे आयुक्त म्हणून कार्यरत आहे.

# डॉ. प्रशांत गायकवाड़ को 'सनातन गौरव सम्मान' से किया गया सम्मानित

**भारतीय सनातन संस्कृति, संगीत एवं ज्योतिष के वैज्ञानिक दृष्टिकोण पर दिया व्याख्यान, २४ हजार विद्यार्थियों को नि :शुल्क शिक्षा देने के कार्य की हुई सराहना**

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राष्ट्र, संस्कृति एवं समाजहित के लिए समर्पित संस्था परिवर्तन योगेश की ३८ वीं सुदर्शन सभा का आयोजन ३ अक्टूबर २०२६ को न्यू दिल्ली में श्रद्धा, गरिमा एवं सांस्कृतिक वातावरण के बीच किया गया। इस अवसर पर भारतीय शास्त्रीय संगीत के साधक, प्रख्यात तबला वादक एवं ज्योतिषाचार्य डॉ. प्रशांत गायकवाड़ को भारतीय सनातन संस्कृति के संरक्षण, संवर्धन एवं प्रचार-प्रसार में उनके योगदान के लिए सनातन गौरव सम्मान से सम्मानित किया गया। यह सम्मान परिवर्तन योगेश के उपसंगठन महर्षि सत्यसनातन हिन्दी विद्यापीठ वाराणसी द्वारा प्रदान किया गया।

कार्यक्रम में संत डॉ. हरीश मिश्रा, राष्ट्रीय अध्यक्ष, परिवर्तन योगेश, नई दिल्ली; डॉ. योगेश तरहेन, संस्थापक अध्यक्ष, परिवर्तन योगेश; महामंडलेश्वर निरंकार नंद महाराज, पीठाधीश्वर एवं उपकुलपति, वाराणसी, महर्षि सत्यसनातन हिन्दी विद्यापीठ तथा डॉ. रवि कुमार द्विवेदी, कुलपति, महर्षि सत्यसनातन हिंदी विश्वविद्यालय, वाराणसी सहित अनेक संत, विद्वान, शिक्षाविद् एवं संस्कृति प्रेमी उपस्थित रहे।

कार्यक्रम का शुभारंभ दीप प्रज्वलन के साथ हुआ। इसके पश्चात सामूहिक रूप से वंदे मातरम् का गायन किया गया तथा सुदर्शन सभा का गीत प्रस्तुत किया गया। प्रसिद्ध कथक नृत्यांगना श्रीमती कल्पना शर्मा ने भावपूर्ण कृष्ण वंदना प्रस्तुत कर उपस्थित जनसमूह को मंत्रमुग्ध किया। कला क्षेत्र में योगदान के लिए उन्हें कला शिरोमणि सम्मान से सम्मानित किया गया। सभा में विद्वत्ता एवं शैक्षणिक योगदान के लिए तीन विद्वानों को विद्यासागर तथा ३३ महानुभावों को विद्यावाचस्पति सम्मान से अलंकृत किया गया। इसी क्रम में डॉ. प्रशांत गायकवाड़ को सनातन गौरव सम्मान प्रदान किया गया।

सनातन संस्कृति और विज्ञान के अंतसंर्बंधों पर डॉ. प्रशांत गायकवाड़ ने भारतीय सनातन संस्कृति की प्राचीनता, प्रकृति से उसके संबंध तथा संगीत, ज्योतिष और पारंपरिक ज्ञान के विभिन्न पहलुओं पर विस्तार से विचार रखे। उन्होंने कहा कि भारतीय संस्कृति में प्रकृति, जीवन, ध्वनि, परंपरा और आध्यात्मिक चिंतन का गहरा संबंध रहा है। सनातन परंपरा को समझने के लिए उसके सांस्कृतिक, दार्शनिक और प्राकृतिक संदर्भों का अध्ययन आवश्यक है।

उन्होंने भगवा रंग को सूर्य की उषाकालीन एवं सायंकालीन लालिमा से जोड़ते हुए भारतीय सांस्कृतिक प्रतीकों की चर्चा की। उन्होंने जीवन और मृत्यु से जुड़ी पिंड परंपरा, ग्रहों के प्रतीकात्मक महत्त्व तथा प्रकृति के संरक्षण में पीपल, बरगद और तुलसी जैसे पौधों की भूमिका का उल्लेख किया। उन्होंने यह भी बताया कि भारतीय परंपराओं में प्रकृति के प्रति सम्मान और पर्यावरण संरक्षण की भावना विभिन्न धार्मिक एवं सांस्कृतिक आचरणों में अभिव्यक्त होती है।

डॉ. गायकवाड़ ने संगीत और ज्योतिष के बीच तुलनात्मक संबंधों पर भी अपने विचार प्रस्तुत किए। उन्होंने भारतीय शास्त्रीय संगीत के बारह स्वरों तथा ज्योतिषीय कुंडली के बारह भावों का उल्लेख करते हुए दोनों विषयों के बीच संख्यात्मक समानताओं और उनके सांस्कृतिक संदर्भों की चर्चा की। उन्होंने कथक और तबले की पारंपरिक बोल-रचना, कृष्ण की बांसुरी तथा भारतीय संगीत की गुरु-शिष्य परंपरा , भारतीय ज्ञान परंपरा का अध्ययन आधुनिक समय में भी शोध, संवाद और विवेकपूर्ण दृष्टिकोण के साथ किया जाना चाहिए। संगीत, ज्योतिष और भारतीय सांस्कृतिक विरासत के विभिन्न पहलुओं को समझने के लिए परंपरागत ज्ञान के साथ प्रमाण-आधारित अध्ययन भी महत्त्वपूर्ण है।



डॉ. प्रशांत गायकवाड़ का योगदान केवल मंचीय प्रस्तुतियों और व्याख्यानों तक सीमित नहीं है। वे भारतीय शास्त्रीय संगीत, विशेषकर तबला वादन, के प्रशिक्षण तथा सांस्कृतिक शिक्षा के प्रसार के लिए निरंतर कार्य कर रहे हैं। उनके द्वारा अब तक लगभग २४,००० विद्यार्थियों को निःशुल्क शिक्षा एवं प्रशिक्षण प्रदान किए जाने की जानकारी दी गई। उनका उद्देश्य आर्थिक एवं सामाजिक परिस्थितियों से परे अधिकाधिक विद्यार्थियों तक भारतीय संगीत और सांस्कृतिक ज्ञान पहुँचाना है। वे गुरु-शिष्य परंपरा के माध्यम से नई पीढ़ी को भारतीय कला, संगीत एवं सांस्कृतिक मूल्यों से जोड़ रहे हैं। उनकी संगीत साधना में पारंपरिक ज्ञान के संरक्षण, विद्यार्थियों के मार्गदर्शन तथा भारतीय संस्कृति के व्यापक प्रचार-प्रसार को विशेष स्थान प्राप्त है।

डॉ. गायकवाड़ को इससे पूर्व नालंदा विद्यापीठ से ज्योतिष विषय में डॉक्टरेट संबंधी सम्मान/उपाधि प्राप्त होने की जानकारी भी दी गई। हाल ही में उन्हें वाराणसी में गुरु-शिष्य परंपरा के अंतर्गत आदर्श शिक्षक पुरस्कार से सम्मानित किए जाने का भी उल्लेख किया गया। विभिन्न मंचों पर उनके सांस्कृतिक एवं शैक्षणिक कार्यों को सराहना मिली है।

सनातन गौरव सम्मान प्राप्त होने पर डॉ. प्रशांत गायकवाड़ ने भारतीय संस्कृति, शास्त्रीय संगीत एवं गुरु-शिष्य परंपरा के संरक्षण और प्रचार-प्रसार के प्रति अपनी प्रतिबद्धता व्यक्त की। उनके कार्यों का प्रमुख उद्देश्य भारतीय सांस्कृतिक विरासत को नई पीढ़ी तक पहुँचाना, विद्यार्थियों को संगीत शिक्षा के अवसर उपलब्ध कराना तथा भारतीय ज्ञान परंपरा के विविध आयामों पर संवाद को प्रोत्साहित करना है।

कार्यक्रम का सूत्र संचालन एवं आभार प्रदर्शन पत्रकार संजय कुमार, वाराणसी ने किया। आयोजन की व्यवस्थाओं में सुनील दुग्गल, डॉ. टीकाम सिंह, डॉ. यशस्वीदेव प्रसाद शर्मा, आचार्य डॉ. देव कुमार पांडे, राकेश कुमार, डॉ. महेंद्र मोहन अवस्थी एवं गिरीराज सिंह का योगदान रहा।

सुदर्शन सभा ने भारतीय संस्कृति, विद्वत्ता, कला और समाजसेवा के क्षेत्र में कार्यरत प्रतिभाओं को सम्मानित करते हुए सांस्कृतिक मूल्यों के संरक्षण एवं प्रसार का संदेश दिया। डॉ. प्रशांत गायकवाड़ को प्रदान किया गया सनातन गौरव सम्मान उनके संगीत, शिक्षा और सांस्कृतिक जागरूकता से जुड़े प्रयासों के प्रति सम्मान का प्रतीक रहा।